




# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com








* वर्ष ६५ वे * अंक ८६ * नांदेड * बुधवार, दि. १ एप्रिल २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎ : 255777, Fax :252211


# राज्यात अवकाळीचा तडाखा!

## गारपीट, विजांचा कडकडाट अन् वादळी पाऊस गहू, मका, आंबा जमीनदोस्त

**मुंबई (प्रतिनिधी)-** गेल्या २४ तासांपासून राज्यभरात वादळी वाऱ्यासह पाऊस आणि गारपीट होताना दिसत आहे. पुन्हा एकदा अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावली असून मराठवाड्यासह अनेक जिल्ह्यांना याचा मोठा फटका बसत आहे. पुढील ४ दिवस राज्यभरात अवकाळी पाऊस आणि गारपीटीचे इशारे देण्यात आले आहेत.

मराठवाडा, विदर्भसह मध्य महाराष्ट्रात हवामान विभागाचे हाय अलर्ट देण्यत आलेत. दरम्यान, धाराशिव जिल्ह्यात सकाळपासून ढगाळ वातावरण असून विजांच्या कडकडाटासह सोसाट्याच्या वाऱ्याचा आणि काही ठिकाणी गारपिटीचाही इशारा देण्यात आला आहे. हवामान विभागाने धाराशिवसह बीड आणि लातूर जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट जारी केला आहे. या सततच्या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले असून तोंडचा घास हिरावल्याची भावना व्यक्त केली जात आहे. तात्काळ पंचनामे करून आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.

हवामान विभागाच्या माहितीनुसार, विदर्भ ते दक्षिण भारतापर्यंत कमी दाबाचा पट्टा सक्रिय झाल्याने राज्यभर पावसाचे वातावरण निर्माण



झाले आहे. त्यामुळे पुढील काही दिवस राज्यात अवकाळी पावसाचा जोर कायम राहण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

हवामान विभागाच्या अंदाजानुसार, धाराशिव जिल्ह्यात ताशी ५० ते ६० किमी वेगाने वारे वाहण्याची शक्यता आहे. तसेच विजांच्या कडकडाटासह मेघगर्जना आणि तुरळक ठिकाणी गारपीट होण्याचा अंदाज आहे. प्रशासनाने नदीकाठच्या गावांना सतर्कतेच्या सूचना दिल्या आहेत.

जळगाव जिल्ह्यातील अनेक भागांत पुन्हा एकदा वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाने हजेरी लावली असून यामुळे शेतीचे मोठे नुकसान झाले आहे. मका, ज्वारी, बाजरी तसेच कांदा बियाणे पिकांना याचा मोठा फटका बसला आहे. गेल्या काही वर्षांपासून मार्च-एप्रिल या उन्हाळ्याच्या काळात जळगाव जिल्ह्यात अवकाळी पावसाचे प्रमाण वाढल्याचे पाहायला मिळत आहे. विशेष म्हणजे, मागील पंधरवड्यातही अवकाळी पावसाने हजेरी लावली होती. त्यावेळी काढणीसाठी तयार असलेल्या गहू आणि हरभरा पिकांचे मोठे नुकसान झाले होते. या नुकसानीतून शेतकरी सावरत नाहीत तोच काल रात्री पुन्हा एकदा अवकाळी पावसाने धडक दिली. जळगाव, भुसावळ, एरंडोल, धरणगाव आणि मुक्ताईनगर तालुक्यांतील अनेक भागांत वादळी वाऱ्यासह पाऊस झाला, ज्यामुळे शेतीचे नुकसान अधिकच वाढले आहे. या पार्श्वभूमीवर, नुकसानीचे तातडीने पंचनामे करण्यात यावेत आणि शेतकऱ्यांना आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी शेतकरी वर्गातून जोर धरत आहे.

दि. १ एप्रिल रोजी नाशिक, नगर, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, बीड, परभणी, हिंगोली, जालना, संभाजीनगर, जळगाव जिल्ह्याला वादळी वाऱ्यासह पावसाचा ऑरेंज अलर्ट देण्यात आलाय. उर्वरित बहुतांश जिल्ह्यांना पावसाचा यलो अलर्ट देण्यात आला आहे.

# नांदेड जिल्ह्यात अवकाळी पावसामुळे पिकांचे मोठे नुकसान; वीज पडून जनावरे मृत्यूमुखी

**नांदेड (प्रतिनिधी)-** जिल्ह्यात सोमवार दि. ३० मार्च रोजी रात्री अवकाळी पावसाने अनेक ठिकाणी हजेरी लावली. दुपारनंतर वातावरणात अचानक बदल होऊन वादळी वाऱ्यांसह रात्री उशिरा पावसाला सुरुवात झाली. या वादळी वाऱ्यामुळे ज्वारीचे पीक आडवे पडले, तर बागायती भागातील केळीची पाने फाटून मोठे नुकसान झाले आहे.

या पावसामुळे हळद शिजवणी करणाऱ्या शेतकऱ्यांचीही धावपळ उडाली. अचानक आलेल्या पावसामुळे हळदीचे नुकसान टाळण्यासाठी शेतकऱ्यांना मोठी कसरत करावी लागली. दरम्यान, पावसासोबत वीज कोसळल्याने उमरी तालुक्यातील सावरगाव कला येथे होसाजी बाजीराव जोगदंड यांचा एक बैल ठार झाला.

भारतीय हवामान विभागाने नांदेड जिल्ह्यात ३० मार्च ते ३ एप्रिल २०२६ दरम्यान अवकाळी पावसाचा अंदाज व्यक्त केला आहे. या अंदाजानुसार रविवारीच ढगाळ वातावरण तयार झाले होते. सोमवारी दुपारनंतर वाऱ्याचा वेग वाढत गेल्याने सायंकाळी जिल्ह्यातील अनेक भागांत पावसाने जोरदार हजेरी लावली.



मंगळवारीही जिल्ह्यात ढगाळ वातावरण कायम असून, पुढील काही दिवस पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे. त्यामुळे शेतकरी सतर्क झाले असून, सध्या रब्बी हंगामातील ज्वारी, गहू तसेच टरबूज, खरबूज आणि भाजीपाला पिकांना संभाव्य फटका बसण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

# राज्यात १० वरिष्ठ आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्या

**मुंबई (प्रतिनिधी)-** महाराष्ट्राच्या प्रशासनात महत्त्वपूर्ण फेरबदल करत राज्य सरकारने आज, मंगळवारी एकाचवेळी १० वरिष्ठ सनदी अधिकाऱ्यांच्या बदल्या जाहीर केल्या आहेत. या बदल्यांमध्ये विविध महत्त्वाच्या विभागांतील पदांवर नव्या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत.

यामध्ये लोकेश चंद्रा (आयएएस १९९३) मुख्यमंत्री यांचे अतिरिक्त मुख्य सचिव, मुंबई, अश्विनी भिडे (आयएएस १९९५) आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, विकास चंद्र रस्तोगी (आयएएस १९९५) अतिरिक्त मुख्य सचिव (वित्तीय सुधारणा), वित्त विभाग, विनिता वैद सिंघल (आयएएस १९९६ ) प्रधान सचिव, मृद व जलसंधारण विभाग, परिमल सिंग (आयएएस २००४) सचिव (कृषी), कृषी व एडीएफ विभाग, तुकाराम मुंढे (आयएएस २००५) सचिव, आपत्ती व्यवस्थापन व पुनर्वसन विभाग, लहू माळी (आयएएस २००९) व्यवस्थापकीय संचालक, शिवशाही पुनर्वासन प्रकल्प लिमिटेड, माणिक गुरसाल (आयएएस ड २००९) सचिव, दिव्यांग कल्याण विभाग, प्रेरणा देशभ्रतार (आयएएस २०१०) आयुक्त, मत्स्यव्यवसाय विभाग, पृथ्वीराज बी. पी. (आयएएस २०१४) आयुक्त, वसई-विरार महानगरपालिका या दहा आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत.

मागील सहा महिन्यांपासून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आणि हिवाळी अधिवेशनामुळे प्रशासकीय बदल्या रखडल्या होत्या. मात्र मार्च अखेरीस या बदल्या अपेक्षित होत्या. त्यानुसार २८ मार्च रोजी काही बदल्या झाल्यानंतर आज मोठ्या प्रमाणावर फेरबदल जाहीर करण्यात आले.

# भरधाव हायवाच्या धडकेत दुचाकीस्वार हभप मधुकर महाराज यांचा मृत्यू

**नांदेड (प्रतिनिधी)-** नांदेड-उस्माननगर रोडवर भरधाव वेगाने जाणाऱ्या हायवा टिप्परने दुचाकीस्वार असलेल्या हभप मधुकर महाराज बारूळकर यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. या अपघातात त्यांचा मृत्यू झाल्याची घटना दि. ३१ मार्च रोजी सायंकाळी ५.३० वाजेच्या सुमारास घडली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार दि. ३१ मार्च रोजी सायंकाळी ५.३० वाजता नांदेड-उस्माननगर रोडवरील ढवळे चौक ते आनंद दिघे चौकालगत रिकामा असलेल्या भरधाव टिप्पर क्रमांक एम.एच.२६ सी.एच.४३८६ ने दुचाकी क्र. एम.एच.२६ सी.एस.०५१४ या दुचाकीस्वार हभप मधुकर महाराज बारूळकर यांच्या गाडीला



जोरदार धडक दिली. या अपघातात त्यांचा जागीच मृत्यू झाला. घटनेची माहिती कळताच घटनास्थळी भाजपचे नगरसेवक संजय पाटील घोगरे, किंवळा सरपंच प्रतिनिधी साईनाथ पाटील टरके, सामाजिक कार्यकर्ते देविदास बसवदे, जयवंतराव काळे व नातेवाईक अशोक पाटील टरके आदींनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती.

घटनास्थळी पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर व पोलीस अंमलदार मारोती माने यांच्यासह पोलीस कर्मचाऱ्यांनी धाव घेऊन तात्काळ पंचनामा केला. घटनास्थळावरून मयताचे प्रेत शासकीय रुग्णालयात शवविच्छेदनसाठी पाठविण्यात आले तर दुचाकी व हायवा टिप्पर ग्रामीण पोलीस स्टेशन येथे लावण्यात आला आहे.

हभप मधुकर महाराज बारूळकर यांनी मराठा सेवा संघ, नामदेव तुकाराम वारकरी परिषदेचे मोठे काम केले आहे.तसेच मराठा-बहुजन समाजाच्या किर्तनातूनही त्यांनी समाजप्रबोधनचे कार्य केले आहे.

मयत हभप मधुकर महाराज बारूळकर हे पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर कदम व सेल्स टॅक्स अधिकारी दिलीप मधुकर कदम यांचे वडील होत.

# ई-केवायसी पूर्ण न केल्यास पगार रखडणार

**मुंबई (प्रतिनिधी)-** राज्य सरकारने घेतलेल्या महत्त्वाच्या निर्णयामुळे सर्व राज्य सरकारी कर्मचाऱ्यांना आता पगार मिळवण्यासाठी ईकेवायसी बंधनकारक करण्यात आली आहे. एप्रिलपासून पुढील पगार आता ई-केवायसी केल्यानंतरच कर्मचाऱ्यांना मिळणार आहे. लाडकी बहीण योजनेनंतर आता राज्य सरकारने सरकारी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठी 'ई-केवायसी' अनिवार्य करण्याचा मोठा निर्णय घेतला आहे. पारदर्शकता आणण्यासाठी आणि वेतनातील गैरप्रकार रोखण्यासाठी प्रशासनाने हे पाऊल उचलले आहे. ज्या कर्मचाऱ्यांची ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण होणार नाही, त्यांच्या पुढच्या महिन्याच्या पगारावर टांगती तलवार असणार आहे. वित्त विभागाने यासंदर्भात अधिकृत परिपत्रक जारी करून सर्व विभागांना सूचना दिल्या आहेत.


# युद्धाचा ३२ वा दिवस; इराण-इस्रायल संघर्ष अधिक तीव्र

**तेहरान (वृत्तसंस्था)-** मध्य पूर्वेमध्ये सुरू असलेल्या युद्धाचा आज ३२वा दिवस आहे. अमेरिका आणि इस्रायल यांनी २८ फेब्रुवारी २०२६ रोजी इराणवर हल्ला सुरू केल्यानंतर संपूर्ण मध्य पूर्वेमध्ये तणाव कायम आहे. एक महिना उलटल्यानंतरही हल्ले आणि प्रत्युत्तरात्मक कारवाया सुरूच असून सलग ३२व्या दिवशीही स्फोटांचे आवाज ऐकू येत आहेत. मंगळवारी पहाटे इराणने इस्रायलची राजधानी जेरुसलेमवर हल्ला केला, तर इस्रायलने तेहरानमध्ये हल्ले केल्याने तेथील काही भागांतील वीजपुरवठा खंडित झाला. याशिवाय लेबनानमध्ये लष्करी कारवाईदरम्यान चार इस्रायली सैनिकांचा मृत्यू झाला. या युद्धात आतापर्यंत किती नुकसान झाले किंवा कोणती जीवितहानी झाली हे अद्याप स्पष्ट झालेले नाही.

# महाराष्ट्रात १६ मेपासून जनगणना

**मुंबई (प्रतिनिधी)-** २०२७ च्या जनगणनेचे वेळापत्रक देशव्यापी जाहीर करण्यात आले आहे. महाराष्ट्रात जनगणनेचा पहिला टप्पा १६ मे ते १४ जून २०२६ या कालावधीत पार पडेल. स्व-गणना १ मे ते १५ मे २०२६ या कालावधीत केली जाईल.

हा देशव्यापी जनगणना कार्यक्रम १६ एप्रिल २०२६ रोजी सुरू होईल आणि ३० सप्टेंबरपर्यंत चालेल. ही जनगणना प्रथमच डिजिटल पद्धतीने केली जात असून, प्रथमच स्व-गणनेचा पर्याय उपलब्ध करून देण्यात आला आहे. स्व-गणना ही एक सुरक्षित वेब-आधारित सुविधा आहे, ज्याद्वारे प्रतिसादक घरोघरी जाऊन सर्वेक्षण करण्यापूर्वी १६



भाषांमध्ये आपली माहिती ऑनलाइन नोंदवू शकतात. या जनगणनेत डेटाची सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी सर्व आवश्यक तरतुदी करण्यात आल्या आहेत. देशभरात ३० लाखांहून अधिक गणक, पर्यवेक्षक आणि इतर अधिकारी २०२७ ची जनगणना पार पाडतील. गणक त्यांच्या स्मार्टफोनचा वापर करून एका मोबाईल ॲपद्वारे थेट डेटा गोळा करून सादर करतील.

भारताच्या भविष्यातील नियोजनासाठी अत्यंत महत्त्वाची असलेली 'जनगणना २०२७' आता प्रत्यक्षात सुरू होत आहे. या मोहिमेचा पहिला टप्पा, जो 'घरयादी व घरगणना' असा आहे, तो आगामी १६ मे ते १४ जून २०२६ या कालावधीत संपूर्ण राज्यात राबविण्यात येणार आहे. 'आपली जनगणना आपला विकास' या संकल्पनेवर आधारित ही प्रक्रिया राबवण्यासाठी प्रशासन सज्ज झाले आहे. या पहिल्या टप्प्यात केवळ घरांची नोंदणी आणि घरांमध्ये उपलब्ध असलेल्या सोयीसुविधांची माहिती संकलित केली जाणार आहे.

# बिहारच्या शीतला देवी मंदिरात झालेल्या चेंगराचेंगरीत ८ जणांचा मृत्यू, ८ जण जखमी

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)-** बिहारमधील नालंदा येथे एक मोठी घटना घडली आहे. शीतला देवी मंदिरात चेंगराचेंगरी झाली आहे. या घटनेत आठ जणांचा मृत्यू झाला असून आठ जण जखमी झाले आहेत.

मंगळवारी, नालंदा जिल्ह्यातील दिपनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील माघरा गावातील शीतला देवी मंदिरात भाविकांची मोठी गर्दी जमली होती. पूजेदरम्यान गर्दी अनियंत्रित झाली आणि चेंगराचेंगरी झाली. घटनेची माहिती मिळताच, दीपनगर पोलीस ठाण्याचे अधिकारी घटनास्थळी पोहोचले आणि जखमींना रुग्णालयात पाठवण्यात आले.

घटनेच्या वेळी उपस्थित असलेल्या एका तरुणाने सांगितले, आज सकाळपासून मंदिरात भाविकांची गर्दी होती. याच दरम्यान झालेल्या चेंगराचेंगरीत अनेक जण मरण पावले आणि बरेच जण जखमी झाले. सर्व काही सुरळीत सुरू होते. अचानक चेंगराचेंगरी झाली आणि असे का घडले हे कळले नाही. लोक इकडेतिकडे धावू लागले. गर्दीच्या व्यवस्थापनासाठी बॅरिकेड आणि रांगा लावल्या होत्या. गर्दीच्या सुरक्षेसाठीही लोक उपस्थित होते. पण मला माहीत नाही की कोणी गोंधळ घातला आणि लोक इकडेतिकडे धावू लागले. ही जत्रा शतकानुशतके सुरू आहे. प्रत्येक वेळी सर्व काही सुरळीत पार पडते. यावेळी ही चेंगराचेंगरी कशी झाली हे मला माहीत नाही.

पोलीस आता या चेंगराचेंगरीचा आणि त्यामागे काही कट आहे का याचा तपास करत आहेत.







# बिलोलीच्या 'तलवार बाबा'चा पर्दाफाश

## तिघांना कोठडी

**नांदेड (प्रतिनिधी)-** सध्या राज्यभरात गाजत असलेला नाशिकचा भोंदू अशोक खरातनंतर नांदेड जिल्ह्यातील बिलोलीमधील तलवार बाबाचा नुकताच पर्दाफाश झाला आहे. दरम्यान या बाबाविरूद्ध बिलोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यानंतर त्याच्या भक्तांनी ठाण्यातच धुडगूस घातला. या बाबासह इतरांना न्यायालयाने पोलीस कोठडी सुनावली आहे.

संपूर्ण राज्यामध्ये अशोक खरात या भोंदू बाबाचे कारनामे सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहेत. हे प्रकरण सध्या गाजत असतानाच बिलोली तालुक्यातील वडूर येथे तलवार बाबाचा पर्दाफाश झाला आहे. सदर बाबा उर्फ ज्ञानेश्वर करडे हा जादूटोणा करून महिलांसह नागरिकांना जाळ्यात ओढून विविध प्रकारचे लिंबू कापून त्यांच्या अंगावर



टाकायचा. यातून कोणत्याही प्रकारचा आजार कमी होतो. मी देवाला प्रसन्न केले आहे, अशी बतावणी करत होता. हा प्रकार जास्तच वाढल्याने वड-भोंदूर येथील काही नागरिकांच्या तक्रारीनंतर विलोली पोलिसांनी येथील विरोबा महाराजांच्या मंदिरामध्ये वास्तव्यास असलेल्या तलवार बाबास चौकशीसाठी २९ मार्च रोजी ताब्यात घेतले होते.

दुसऱ्या दिवशी ही बाब समजताच बाबाचे समर्थक शिवकांत शिवराम मैलारे (वय ३५) आणि नवाजी बाबा वाघेकर (वय ३४, दोन्ही रा. गांधीचौक, बिलोली) हे पोलीस ठाण्यात घुसले. तुम्ही बाबावर गुन्हा का दाखल करता ? असा जाब विचारत त्यांनी पोलीस कर्मचारी माधव तोटेवाड यांनी लिहिलेली फिर्याद हिसकावून फाडून टाकली. एवढ्यावरच न थांबता, शिवकांत मैलारे याने एका पोलीस कर्मचाऱ्याची कॉलर पकडून धक्काबुक्की केली, तर नवाजी वाघेकर याने पोलिसांना धक्का देऊन खाली पाडले. यावेळी बाबा ज्ञानेश्वर करडे उर्फ तलवार बाबा यानेही या साहेबांना सोडू नका अशी चिथावणी आपल्या समर्थकांना दिली.

या झटापटीत पोलीस कर्मचाऱ्याच्या गणवेशाची दोन बटणे तुटली असून, आरोपींनी त्यांना तुला एकट्यात गाठून बघून घेतो अशी जीवे मारण्याची धमकी दिली. या धक्कादायक घटनेतील तिन्ही आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला असून न्यायालयाने या आरोपींना पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करण्यात येत असून पुढे उपलब्ध पुराव्यानुसार कारवाई केली जाईल, असे पोलीस निरीक्षक अतुल भोसले यांनी सांगितले.

# राज्यात नवे रेडी रेकनर दर जाहीर

**मुंबई (प्रतिनिधी)-** अमेरिका-इराण युद्धामुळे निर्माण झालेली जागतिक भू-राजकीय परिस्थिती आणि रिअल इस्टेट क्षेत्रातील मंदी लक्षात घेता महाराष्ट्र सरकारने २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी रेडी रेकनर (आरआर) जाहीर केला आहे. याबाबत राज्य महसूल विभागाने ३१ मार्च रोजी जारी केलेल्या निवेदन प्रसिद्ध केले आहे. ज्यात नव्या रेडी रेकनर दराबद्दल माहिती देण्यात आली आहे.

रेडी रेकनर दर म्हणजे सरकारने निश्चित केलेले किमान दर, ज्याच्या आधारे मालमत्ता व्यवहारांवर स्टॅम्प ड्युटी आणि नोंदणी शुल्क आकारले जाते. याच दरांच्या आधारे आयकरासाठी कॅपिटल गेनची गणना देखील केली जाते. तसेच हे दर रिअल इस्टेट डेव्हलपर्सकडून महानगरपालिकांना देय असलेल्या विविध शुल्कांशी, प्रीमियम्सशी आणि एफएसआय दरांशी जोडलेले असतात.

# भोंदू अशोक खरातची पत्नी कल्पना खरात फरार

**नाशिक (प्रतिनिधी)-** शेकडो महिलांचे लैंगिक शोषण केलेल्या अशोक खरातची पत्नी कल्पना खरात फरार झाली आहे. कल्पना खरात यांच्यावर आर्थिक फसवणुकीचा गुन्हा दाखल झाल्यानंतर त्या फरार झाल्याची माहिती आहे. कल्पना खराततया अटकेसाठी दोन पथकं नाशिक आणि पुण्याच्या दिशेने रवाना झाल्याची सूत्रांनी माहिती दिली.

अशोक खरातसोबत आता त्याची पत्नी कल्पना खरात यांच्यावर शिर्डी पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यानंतर त्या फरार झाल्याची माहिती असून पोलिसही त्यांच्या मागावर आहेत. फसवणुकीचा गुन्हा दाखल झाल्यानंतर पोलीस कारवाई करणार आणि अटक करणार असल्याची कुणकुण लागल्यानंतर कल्पना खरात फरार झाल्याची माहिती आहे.

शिर्डीतील ४ एकर भूखंड खरेदीप्रकरणी अशोक खरातसह ५ जणांवर गुन्हा दाखल झालाय. मूळ जमीन मालक रावसाहेब गोंदकर यांच्या फिर्यादीवरून हा गुन्हा दाखल झाला आहे. जमीन खरेदी व्यवहारात फसवणूक केल्याप्रकरणी अशोक खरात, त्याची पत्नी कल्पना खरात, शिर्डीतला मध्यस्थ अरविंद बावके, किरण सोनावणे, अशोक तांबे यांच्यावर गुन्हा दाखल झाला आहे.

दरम्यान, शिर्डीमध्ये गुन्हा दाखल झाल्यावर खरातची पत्नी फरार झाल्याची माहिती आहे. अरविंद बावके आणि किरण सोनावणे यांना ताब्यात घेण्यात आलं आहे. फसवणूक आणि सावकारी अधिनियमांतर्गत शिर्डी पोलीस ठाण्यात हा गुन्हा दाखल झाला आहे. कर्ज फेडण्यासाठी व्याजाने पैसे देत जमीन बळकावल्याचा आरोप आहे. शिर्डीत भोंदू खरातची कोट्यवधींची मालमत्ता आहे. या सर्व व्यवहारांची एसआयटी चौकशी करत आहे.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन
संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ
**गोदातीर समाचार**
संपादक
केशव घोणसे पाटील

# ‘एप्रिल फूल’ की अज्ञानाचा उत्सव?

१ एप्रिल हा दिवस जगभर ‘एप्रिल फूल’ म्हणून साजरा केला जातो. परंपरेच्या नावाखाली एकमेकांची थट्टा, खोड्या आणि फसवणूक करण्यात काहींना आनंद मिळतो. परंतु आजच्या डिजिटल आणि संवेदनशील समाजात या ‘मस्करी’ची मर्यादा ओलांडली जात आहे, हे लक्षात घेणे गरजेचे आहे. कारण आता एखाद्याला चुकीची माहिती देणे, दिशाभूल करणे किंवा फसवणूक करणारे संदेश पाठवणे हे केवळ विनोद राहिलेले नाही; ते कायदेशीर गुन्ह्याच्या कक्षेत येऊ शकते. खरे तर दुसऱ्याला मूर्ख बनविण्याची प्रवृत्ती नवी नाही. ती मानवी स्वभावात खोलवर रुजलेली आहे. मात्र आजच्या काळात या प्रवृत्तीने अत्यंत धोकादायक वळण घेतले आहे. विशेषतः सोशल मीडियाच्या युगात, व्हॉट्सॲप, फेसबुक आणि इतर माध्यमांवरून अफवा, अपप्रचार आणि खोट्या बातम्यांचा पूर आलेला दिसतो. एकमेकांना ‘एप्रिल फूल’ बनवण्याची ही स्पर्धा आता वर्षभर सुरू असते ती फक्त १ एप्रिलपुरती मर्यादित राहिलेली नाही. यातील सर्वात चिंताजनक बाब म्हणजे लोकांचा अंधविश्वास. कोणतीही माहिती तपासून न पाहता, तिचा स्रोत न पडताळता ती लगेच खरी मानण्याची प्रवृत्ती वाढत आहे. अभ्यासाचा अभाव, माहितीची कमतरता आणि विचार करण्याची अनिच्छा यामुळे अनेकजण सहजपणे फसतात. विशेषतः निरागस आणि निष्पाप लोक याचे बळी ठरतात. त्यामुळे ‘मूर्ख बनविणे’ ही केवळ विनोदाची गोष्ट न राहता, ती सामाजिक समस्येचे रूप धारण करत आहे. आज परिस्थिती इतकी विचित्र झाली आहे की, ज्यांना स्वतःला विषयाचे ज्ञान नाही, तेच इतरांना शिकवण्याचा आव आणतात. पत्रकारिता काय आहे, माहितीची पडताळणी कशी करायची, जबाबदारीने मत कसे मांडायचे, या मूलभूत गोष्टींची जाणीव नसतानाही अनेकजण सोशल मीडियावर तज्ज्ञ असल्यासारखे वागतात. ही केवळ अज्ञानाची नव्हे, तर आत्मभान हरपलेल्या समाजाची लक्षणे आहेत. ‘एप्रिल फूल’ साजरा करताना आपण दुसऱ्याला मूर्ख बनवतो, असा समज असतो. पण वास्तवात, या प्रक्रियेत आपण स्वतःच अज्ञान, अंधश्रद्धा आणि अफवांच्या जाळ्यात अडकत जातो. दुसऱ्याला फसवण्याच्या नादात आपण कधी स्वतः फसतो, हे अनेकांना कळतही नाही. त्यामुळे हा दिवस साजरा करण्याची गरजच काय, असा प्रश्न उपस्थित होतो. कारण आपण वर्षभर अशाच प्रकारे स्वतःची दिशाभूल करून घेत आहोत. यात आणखी एक गंभीर पैलू म्हणजे फसवणुकीचे विविध प्रकार. काहीजण धर्माच्या नावावर लोकांना भुलवतात, तर काही स्वतःला विद्वान म्हणून सादर करून आर्थिक शोषण करतात. समाजातील अर्धवट ज्ञान असलेले आणि दिशाहीन लोक अशा जाळ्यात अडकतात. दुर्दैवाची बाब म्हणजे, अशा प्रकारच्या फसवणुकीवर प्रभावी नियंत्रण ठेवण्यासाठी पुरेशी जागरूकता आणि कठोर अंमलबजावणी दिसत नाही. निसर्गदेखील आपल्याला इशारे देत आहे. ऋतूंचे बदललेले चक्र, अनियमित पाऊस, हवामानातील अस्थिरता, हे सर्व आपण केलेल्या चुका दाखवणारे संकेत आहेत. पण तरीही आपण शहाणपण शिकण्यास तयार नाही. महाभारतासारख्या इतिहासातील घटनांमधूनही आपण धडा घेतलेला नाही. मोठ्या व्यक्तींच्या चुका संपूर्ण समाजाला किती महागात पडतात, हे इतिहास सांगतो; तरीही आपण त्या चुका पुन्हा करत आहोत. आज गरज आहे ती आत्मपरीक्षणाची. दुसऱ्याला मूर्ख बनवण्यापेक्षा स्वतःच्या विचारांची, ज्ञानाची आणि कृतीची तपासणी करण्याची. समाजाने विवेकबुद्धीचा वापर करणे, माहितीची पडताळणी करणे आणि जबाबदारीने वागणे आवश्यक आहे. शिक्षणव्यवस्था, माध्यमे आणि कुटुंब या सर्वांनी मिळून विचारक्षम समाज घडवण्याची जबाबदारी पार पाडली पाहिजे. तसेच, कायद्याची अंमलबजावणी अधिक कठोरपणे होणे गरजेचे आहे. सोशल मीडियावरून पसरवली जाणारी खोटी माहिती, फसवणूक आणि अपप्रचार यावर नियंत्रण ठेवण्यासाठी ठोस उपाययोजना करणे आवश्यक आहे. अन्यथा, हा ‘मूर्खपणाचा उत्सव’ बनून समाजाला अधिक अंधाराकडे नेईल. ‘एप्रिल फूल’ हा केवळ एक दिवस नाही; तो आपल्या समाजाच्या मानसिकतेचे प्रतिबिंब आहे. जर आपण खरोखरच प्रगत आणि जागरूक समाज घडवू इच्छित असू, तर या ‘मूर्खपणाच्या’ साखळीतून बाहेर पडणे आवश्यक आहे. कारण दुसऱ्याला मूर्ख बनवण्याचा प्रयत्न करताना, आपण स्वतः किती मोठे मूर्ख ठरत आहोत, हे ओळखणे हीच खरी शहाणपणाची सुरुवात

# स्वार्थी मनोवृत्ती मनुष्यधर्म विसरते



वाकडेच नाचू आम्ही, बोबडेच गाऊ, बद्धकोष्ठी टिकाकारा हास्यचूर्ण देऊ, दांभिकाची फोडू बिंगे गुदगुल्या करीत।।
डोहाळे लागल्यापरी लोक सारे
आवडीने खाती देशी, पक्क चिंचाबोरे
दीपा म्हणे शब्दातून घ्या चवी समस्त ।।

कोल्हापूर जिल्ह्यातील कुरुंदवाडचे डॉ. दिलीप कुलकर्णी यांच्या ‘कलमी तुरा’ या काव्यसंग्रहाच्या तळपृष्टाला असलेल्या ह्या ओळी आम्ही परीपूर्ण नाही याची कबुली देताना आम्ही ज्या अवस्थेत आहोत त्या अवस्थेत मनमुराद आनंदाची लयलूट करताना आनंद इतरांना वाटण्यासोबतचअत्यंत आत्मकेंद्री व्यक्तींस हास्यचूर्ण देवून त्याची बद्धकोष्ठता नष्ट करुत त्याला मनुष्यजीवनाचा आनंद शिकवूत. दांभिक प्रवृतीची पोलखोल करतांना त्यांना गुदगुल्या करीत हसायला लावूतं.या प्रवृतीचे बिंग फोडणे आणि ते या मागाने फोडणे, ही तर खूप सुंदर कल्पना आहे.

मनुष्यजीवन जगतांना शब्दांचा आनंद घेणारे लोक मानवी जीवनाचा खरा आनंद घेत असतात.हे शब्दाचे चिंचाबोरे खाण्याचे डोहाळे ज्याला लागले.तो जीवनाचा पूर्ण आनंद घेत असतो. फुगून टम्म होऊन हवेत तरंगणारे फुग्याचा मानवीप्रवृतीशी संबध आहे. या प्रवृतीशी हिंसक मार्गाचाअवलंब केल्यास अधिक हिंसा वाढण्याचीच शक्यता आहे.त्यामुळे फुग्याचा जो नेकटाय फिट्ट आहे.तो सैल करुन त्यातील हवा जर काढली तर तो खाली येईल. या प्रवृतीचा गर्व, अहं, दंभ काढून घेणे गरजेचे. सद्गुण तयार होण्यासाठी अगोदर दुर्गुण नष्ट करणे महत्वाचे असते. याचा द्रष्टांतच यातून कविला द्यायचा आहे.

मी पदवी प्राप्त करेपर्यंत किती ज्ञान प्राप्त केले होते.यासंबधी कल्पना देतांना पेपर्स जळाल्यामुळे आम्ही उतीर्ण झालो एवढे आम्ही विद्वान होतो. राख घासून भांडी विसळली जातात.तसे विद्यापिठाने आम्हाला विसळले होते.जसे भ्रष्ट राजकारण्यांना पक्षांतर केल्यावर वॉशिंग मशिनमध्ये टाकल्या जाते. प्रश्न न कळल्याम ुळे ज्यांनी कोरे पेपर्स दिले तेच प्रथम श्रेणीत उतिर्ण झाले होते.विद्यापीठातील हे विद्येचे पिठ पाहून सर्व स्कॉलर्स चिडून गेले होते व काहीच श्रम न घेता जे प्रथम श्रेणीत आले.ते बेधुंद होऊन नाचत होते. पदवीदान संमारभासमयी जेंव्हा आम्हाला ‘जळका पदवीधर’ असे डिवचून ज्यांच्या हस्ते पदवीदान होतं होते तेच खिदळत होते. आम्ही उतिर्ण ज्या प्रक्रियेतून झालो,त्याम ुळे आमच्याकडे सयंम असण्याचा प्रश्नच नव्हता. त्यामुळे त्या मान्य वराचे दात पाडण्याची आमची तिव्र ईच्छा झाली.पण त्याचे दातअगोदरच निखळल्यामुळे आम च्या रागाला काही अर्थ उरला नव्हता.

अलिकडे डॉक्टरांची असलेली व्यापारी वृत्ती रुग्णाच्या जीवाशी कशी खेळते आहे.त्या लुटारू प्रवृतीचा त्यांनी यथायोग्य शब्दात समाचार घेतला आहे. एकवेळा त्याचा नाडीवरुन हात फिरता रुग्णास बरे करण्याऐवजी बरबाद करणारा मानवतेचा शत्रूच होय.केवळ पैसा गोळा करणाऱ्या डॉक्टर नावाच्या लुटारुंना उद्देशून त्यांचे त्यांनी यथायोग्य मूल्यमापन केले आहे.असेच करोना कालावधीतील ’ करोना यौद्धा ’ तर करोनारुग्णखूनीच होते. शिक्षण-क्षेत्रातील विदारक सत्य मांडतांना कटुसत्य किती भयानक असते.सरळमार्गी युवकाला पदवी प्राप्त केल्यावर येणारा अनुभव असा,

मी नैतिकतेसह गुंडाळून
ती पदवी
वशिल्यास जोडूनी लाच,
कार्कुनी मिळवी ।
तो जनास देतो अशिच कामे करुनी,
अन् आमदार होतो सावाला पाडूनी ।।

सत्ता उपभोगतांना त्याची उक्ती व कृती किती भिन्न स्वरुपाची असते.पराकोटीची सत्तेची हाव असणाऱ्या नेत्याचा खरपूस समाचार त्यांनी पुढील काव्यपंक्तीतून घेतला आहे.

वरिष्ठ नेत्या कधी व्हायचा तुझा जीवनांत ? न मज लाभे स्थान तू जोवरी जिवंत !

खरखरता कुठलीशी खुर्ची तव खाटेपाशी, बसावयास्तव तू कोमातून उठोनिया येशी ! ‘वरिष्ठ नेत्या’ या कवितेतील अतिशय उपहासात्मक आणि मार्मिक ह्या ओळी आहेत, पण गेंड्याची कातडी असलेल्या नेत्यांनी कानावर शटर्स टाकून घेतलेले असतात.त्यांना त्यांच्या गैरसोयीचे काहीच ऐकू येत नाही. त्यामुळे शेवटी ते लिहीतात, औरंगजेबच अमुच्यातील तू प्रणाम घे जेष्ठा । नकोस समजू तुझिया मार्गातला मज काटा ।। सत्ता, अधिकार व पैसा याची मस्ती असणारे सत्ताधिश आपले वर्चस्व संपवू पहाणाऱ्या शक्तीलाच संपवून टाकतात.अशी उदा. या सार्वभौम लोकशाहीत अनेक आहेत. त्या राक्षसी प्रवृतीवर त्यांनी प्रकाश टाकला आहे.

क्रिकटप्रेमीसाठी भारता-ने मॅच जिंकणे त्यांच्या जीवनमरणा-चा प्रश्न असतो. याचा अनुभव आपण घेतो पण काही खूप अनपेक्षित निकाल लागतो. त्या- वर त्यांची रचना खूपच सुरेख आहे,’आम्ही यज्ञ केले, कपासाठि येथे।आणले फटाके होवू विश्वविजेते। पूर्व पुण्य ज्याचे जिते टॉस तोची ।कळे काय होती कशा फिक्स मॅची?।। त्यामुळे दिवाळी साजरी करण्या ऐवजी शिमग्याने शेवट होतो.सर्व क्षेत्राचे पैशासाठी पावित्र्य नष्ट होत असल्याने मनाची उदास निराश व विषन्न अवस्था झाल्याने त्या प्रतिकूल परिस्थितीचे मार्मिक चित्रण करतांना विन-ोदी काव्यातून त्यावर प्रहार करणे त्यांना महत्वाचे वाटते.

‘गोरी गोरीपान,फुलासारखी छान. दादा मला एक वहिणी आण.’ हे लोकप्रिय बालगीत आपल्या सर्वांना माहितच आहे,पण एकविसाव्या शतकातील बहीण दादासाठी वहिणी न मागता काय मागते? ‘गोरा गोरापान, नटासारखा छान. दादा मला एक नवरा आण।’ गोऱ्या गोऱ्या नवऱ्याचा पैसैवाला डॅडी । पैसैवाल्या डॅडीवर पोरग्याची कडी। पोरग्याच्या प्रगतीला विदेशी स्थान।। दादा...माझे एवढे काम केल्यावर तुला रोजगार मिळेलच आणि तो सर्व निर्णय म ाझे मत विचारात घेतल्यावरच घेईल.हे मूळ बालगीताचे विडंबन अतिशय कल्पकतेने त्यांनी केले आहे.

निवडणुकीचे वारे हल्ली सुस-ाट वाहत आहे. त्यावरची त्यांची रचना, ‘लोकशाहीच्या पेठेत रग्गड पुढारी। कुणास द्यावे वोट परी? दगडापेक्षा विट बरी । पैसा काळा वाहू लागला। चला रे चला, घ्या धुवून कर त्यात, पुढे आनंदी आनंदी आनंद गडे।। निवडणुकीचा असलेला हा महाभयंकर आजार सर्व सामान्याच्या विचारक्षमतेच्या कोसो दूर आहे. लोक शाहीची होणारी विटंबना पाहुन अस्वस्थ होणारे मन कविजवळ आहे. तो खूप हतबल आणि विवश आहे. त्यामुळे त्यांची बेचैनी खूप मोठ्या प्रमाणात वाढते. जनतेच्या पैशाची होणारी उधळपट्टी, त्यामुळे भविष्यात वाढत जाणारा महागाई निर्देशांक, पैशाचे अवमूल्यन व त्यातून निर्माण होऊ घातलेले उद्याचे प्रश्न त्यांच्या डोळ्यासम ोर येतात. हे सर्व अस्वस्थ करणारे प्रश्न आहेत पण कवीची वृती विनोदी आहे. त्यामुळे या सर्व प्रश्नाचे मर्म ते विनोदाने वाचकाच्या लक्षात आणून देतात.

‘अशीच आमुची आई सुंदर असती तर’ असे छत्रपती वदले हो-ते.हे सर्वांना ज्ञात आहे.पण आम्हास शिकविणाऱ्या शिक्षिका सुंदर नसत्या तर आम्ही थोडेफार शिकलो असतो.फक्त बाईकडे पहातच राहूण नेत्रसुख घेत राहण्याचे रिकामटेकडे उद्योग आम्ही केले नसते.त्या काय शिकवतात यांच्याकडे आमचे लक्षच नसायचे.त्यांचा विवाह झाल्यावर त्या शहरात निघून गेल्या. ह्या विरहवेदना भावी नेताजीला सहन न झाल्याम ुळे त्यांनी शाळा सन्यांस घेवून राजकारणात प्रवेश केला आणि चक्क शिक्षणमंत्री झाले. पण त्यांना सही करण्यापुरती सुद्धा अक्कल आली नव्हती.हे आमच्या देशाचे उज्वल भविष्य ? अशा महान व्यक्तीमत्वाची दखल त्यांच्या वैशिष्टपूर्ण कार्यामुळे कविला घेणे गरजेचे वाटले.

स्वा. सावरकरांच्या ‘स्वतंत्र ते भगवती’ ही अजरामर कविता. स्वातंत्र्याचे स्फुल्लिंग पेटवणारी, पण आज त्या कवितेचा आशय पूर्णता बदलला आहे असे कवीला वाटते त्यामुळे त्यांना ही कविता स्फुरते.’ जयोऽस्तुते...जयोऽस्तुते...हे महन् दुर्मिळे! सुखास्पदे सखये । स्वतंत्र ते घरगुती... स्वागत तुझे असो, ये ये..’अशी सुरुवात करुन ते पुढील ओळीने शेवट करतात.’ हे कडक बंध-भंजिते...तलफ पूर्तते..

हे स्वतंत्रते...। तुजसाठी मटण ते जनन..। तुजवीण वरण ते मरण...। तुज सकलच मिस्टर शरण...। हे स्वतंत्रते! हे स्वतंत्रते !! हे स्वतंत्रते !!! जयोऽस्तुते.... स्वतंत्र भारतात वाढलेल्या स्वैर पिढीचा त्यांना या काव्यपंक्तीतून समाचार घेवून वाचकांच्या एक प्रखर वास्तव लक्षात आणून दिले आहे. त्या तिथे पलहकडे माझ्या प्रियेचे झोपडे या श्रवणीय गिताचा अनेकांनी आस्वाद घेतला आहे. या चालीवर त्याची रचना त्या तिथे पलिकडे, तिकडे गावठी सुरेचे झोपडे। सरळ जाई वाट दारी, पळत जाति पादचारी, परतून नि येती ते, होतं तर्र माकडे। तयास पाही अंधही, सापडे यमासही। ड्युटीतील पोलिसास फक्त ते न सापडे ।। या ओळीतून त्यांनी सुरक्षा व्यवस्थेतील लाचखाऊ वृत्तीवर केलेला प्रहार आपल्या लक्षात येतो. प्रत्येक काव्यरचनेत विसंगत मनुष्य प्रवृत्तीवर प्रहार करून त्यातून विनोदाचा शोध त्यांनी घेतला आहे. त्यामुळे त्यांचा ‘कलमी तुरा’ या काव्यसंग्रहातील काव्यानुभव वाचकांना आनंद देणारा ठरला आहे. स्वार्थी मनोवृत्ती मनुष्यधर्म विसरते. त्या प्रवृत्तीवर आपल्या विनोदी लेखनीने प्रहार करण्याचे कार्य डॉ. दिलीप कुलकर्णी यांनी केले आहे. त्यामुळेच त्या काव्यसंग्रहावर एक विनोदी लेख लिहिण्याचा मोह मला झाला व तो मोह सार्थकी लागला, असे समजण्यास वाचकांची हरकत नसावी.

**-प्रा वसंत गिरी**
मेहकर, जि. बुलडाणा
मो. ९०११२३९२३२

# जलसंकटावर मात करण्याची गरज



संयुक्त राष्ट्रांच्या जागतिक जल विकास अहवालानुसार जगातील पाण्याची मागणी दरवर्षी जवळपास एक टक्क्याने वाढत असून पुढील दोन दशकांत ती आणखी वाढणार आहे. या अहवालानुसार विकसनशील आणि उदयोन्म ुख अर्थव्यवस्था असलेल्या देशांमध्ये पाण्याची मागणी झपाट्याने वाढणार आहे. शेतीपेक्षा औद्योगिक आणि घरगुती वापरासाठी पाण्याच्या मागणीला अधिक वेग येईल. जगभरातील अनेक शहरांना हवामान बदलामुळे पूर आणि दुष्काळासारख्या समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. सध्या भारतातील अनेक शहरांमध्ये पाण्याचे भीषण संकट आहे. विशेष म्हणजे जलसंकटाचा सामना करणारी बहुतांश शहरे नद्यांच्या काठावर वसलेली आहेत. वास्तविक, येथील मोठ्या लोकसंख्येने या नद्यांच्या पाण्याचा अव्याहतपणे वापर केला आहे. अनेक पाण्याचे स्रोत सतत कोरडे होत आहेत.

ज्या वेगाने जंगले नष्ट होत आहेत त्यापेक्षा तिप्पट वेगाने पाण्याचे स्रोत कोरडे होत असल्याचे संशोधनातून दिसून आले आहे. नीती आयोगाच्या २०१८ च्या अहवालानुसार, देशातील अनेक शहरांमध्ये जलसंकट गंभीर स्वरूप धारण करत आहे. दिल्ली, बंगळुरू, चेन्नई, हैदराबाद आदी शहरांना या समस्येचा सर्वाधिक सामना करावा लागणार आहे. २०३० पर्यंत देशातील सुमारे चाळीस टक्के लोकांना पिण्याचे पाणी उपलब्ध होणार नाही. येत्या अकरा वर्षांत देशा-तील साठ कोटींहून अधिक जनतेला पिण्याच्या पाण्यासाठी संघर्ष करावा ला-गेल, अशी भीती व्यक्त होत आहे. जागतिक वन्यजीव निधी (डब्लूडब्लुएफ) च्या सर्वेक्षणात पुढील तीस वर्षांत जगातील १०० शहरांमध्ये पाण्याचे गंभीर संकट निर्माण होणार असल्याचे म्हटले आहे.

गेल्या दहा वर्षात भूजल पातळी ५४ टक्क्यांनी घटली आहे. देशातील ५५ टक्के विहिरी जवळपास कोरड्या पडल्या आहेत. वातावरणातील बदलामुळे आणि वाढत्या तापम ानामुळे भविष्यात दुष्काळाची समस्या अधिक गडद होण्याची शक्यता आहे. तसे पाहिले तर आपल्या देशातील वार्षिक सरासरी पर्जन्यमान ११७० मिमी आहे, जे पश्चिम अमेरिकेपेक्षा जवळ-जवळ सहा पट जास्त आहे. असे असूनही, देशातील शहरी भागातील सुमारे ९ कोटी सत्तर लाख लोक पिण्याच्या स्वच्छ पाण्यापासून वंचित आहेत आणि ग्राम ीण भागातील सुमारे ७० टक्के लोकांना प्रदूषित पाणी प्यावे लागते. देशातील सुमारे ३३ कोटी लोक अशा ठिकाणी राहत आहेत जिथे दरवर्षी भीषण दुष्काळ पडतो. दुष्काळाला वैतागून शेतकरी आत्महत्या करत आ-हेत. देशात अनेक नद्या असल्या तरी त्यातील उपलब्ध पाण्याचा दर्जा मात्र खूपच खालावला आहे.

सध्या एकूण पाण्याच्या वापरापैकी ८५ टक्के पाणी शेतीसाठी, १० टक्के उद्योगांमध्ये आणि ५ टक्के घरांमध्ये वापरले जाते. १९९४ मध्ये, देशात गोड्या पाण्याची दरडोई उपलब्धता सहा हजार घनमीटर होती. सन २००० मध्ये ते प्रति व्यक्ती दोन हजार तीनशे घनमीटर इतके कमी करण्यात आले. २०२५ पर्यंत, त्याची उपलब्धता प्रति व्यक्ती केवळ १६०० घनमीटरपर्यंत कमी होण्याची शक्यता आहे. देशातील पावसाच्या पाण्यापैकी पासष्ट टक्के पाणी समुद्रात वाहून जाते. गटारी- नाल्यांमध्ये दररोज चार लाख लिटर पाणी सोडले जाते. पण यापैकी फक्त २० टक्केच पाणी पुन्हा वापरले जाते. देशभरात पडणाऱ्या एकूण पावसापैकी केवळ पाच टक्के पावसाचे पाणी संरक्षित केले, तरी वर्षभराची १०० कोटींहून अधिक लोकांची तहान भागू शकते. त्यासाठी स्थानिक पातळीवर भूजल व्यवस्थापन प्रकल्प उभारावे लागतील, त्यामुळे लोकांना त्यांच्या भागातील भूजलाच्या उपलब्धतेची माहिती मिळेल आणि ते त्याचा योग्य वापर करू शकतील.

देशातील अनेक नद्या, तलाव आणि जलसाठे कोरडे पडले आ-हेत. त्यामुळे अनेक भागातील पाण्याची पातळी धोकादायक पातळीच्या खाली गेली आहे. ज्या नद्यांवर धरणे बांधून पाण्याचा मुक्त प्रवाह बंद केला आहे, त्या नद्यांनाही धोका निर्माण झाला आहे.ज्या धरणाद्वारा पाणी अडवले जात आहे, त्या पाण्याचा औष्णिक वीज केंद्र, अणुऊर्जा केंद्रे आणि औद्योगिक युनिटसाठी जास्तीत जास्त वापर केला जात आहे. शेतकरी सिंचनासाठी खोल खोदलेल्या कूपनलिकेचा वापर करतात. घरगुती आणि औद्योगिक गरजांसाठीदेखील भूजल साठ्याचा वापर वाढला आहे. भूगर्भातील पाण्याचे योग्य पुनर्भरण होत नाही, उलट आधुनिक तंत्राच्या साहाय्याने जमिनीतील पाणी अक्षरशः शोषून काढले जात आहे. या अंदाधुंद पाणी पिळवणुकीचा परिणाम म्हणजे ज्या भागात दहा वर्षांपूर्वी २०० ते ३०० फुट खोली-वर पाणी उपलब्ध होते, त्या भागात आता पाण्याची पातळी ७०० ते १००० फुट खोल गेली आहे.

आणखी एक गंभीर बाब म्हणजे माणसे तलाव, नद्यांच्या जमिनीवर अतिक्रमण करू लागले आहेत. पाण्याचा अपव्यय थांबविण्यासाठी ठोस प्रयत्न केले जात तर नाहीतच. शिवाय उपलब्ध असलेले साफ व स्वच्छ पाणी-देखील हळूहळू प्रदूषित होत आहे. त्यामुळे जलसंधारण, पाण्याचा विवेकपूर्ण वापर, पाण्याचा पुनर्वापर आणि भूजल पुनर्भरण याकडे अधिक लक्ष देण्याची गरज आहे. युनोस्कोच्या जागतिक जल विकास अहवाल २०१८ मध्ये असे नमूद केले आहे की भारत हा जगातील सर्वात जास्त भूजलाचा अतिशोषण करणारा देश आहे. खते आणि कीटकनाशकांच्या अतिवापरामुळे-देखील जलप्रदूषण वाढत आहे. पाण्याचे शुद्धीकरण करून ते पुनर्वापरासाठी योग्य बनविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. यामध्ये नॅनो तंत्रज्ञानाचा वापर करता येईल. पावसाचे ८५ टक्के पाणी नद्यांमधून समुद्रात जाते. पाणीटंचाईवर मात करण्यासाठी रेन वॉटर हार्वेस्टिंग आणि कृत्रिम पुनर्भरण तंत्र वापरण्याची गरज आहे. विहिरी व कूपनलिका यांची खोली निश्चित केली पाहिजे. एका म ानकानुसार, विहिरी आणि कूपनलिका यांची खोली केवळ चारशे फुट म्हणजे एकशे वीस मीटरपर्यंत असायला हवी. कृषी क्षेत्राच्या सिंचनासाठी ठिबक आणि स्प्रिंकलर पद्धतीचा वापर वाढायला हवा. कृत्रिम पुनर्भरण तंत्राचा अवलंब करून डोंगराळ भागातील भूजल पातळी सुधारता येते. या तंत्राद्वारे वाया जात असलेल्या पाण्याची बचत करून ग्रामीण भागात भूजल पातळी वाढवता येऊ शकते.

जलसंकट टाळण्यासाठी प्रभावी जलव्यवस्थापनासोबतच पाण्याचा गैरवापर रोखण्यासाठी गांभीर्याने पावले उचलण्याची गरज आहे. सरकारकडून होत असलेल्या प्रयत्नांबरोबरच सर्वसामान्यांनाही आपली जबाबदारी समजून घ्यावी लागेल, तरच आपण जलसंकटाला तोंड देऊ शकू. कृषी क्षेत्रातील पाण्याच्या वापरावर नियंत्रण ठेवण्यासाठी, सिंचनाच्या आधुनिक पद्धतींचा अवलंब, पावसाच्या पाण्याचे संवर्धन आणि दूषित पाणी पुनर्वापर करण्यायोग्य करण्यासाठी योग्य प्रयत्न करावे लागतील. यासोबतच भूगर्भातील पाणी प्रदूषणापासून वाचवण्यासाठीही लक्ष द्यावे लागणार आहे.

वॉटर हार्वेस्टिंगचे तंत्र आणि नवनवीन शोध याबरोबरच भारतातील पारंपरिक ज्ञान पद्धतीचाही आपण अवलंब केला पाहिजे. पूर्वी पावसाचे पाणी विहिरी, तलाव, सरो-वर, पाझर तलाव इत्यादींमध्ये पुरेशा प्रम ाणात साचत असे. ती परंपरा आपल्याला पुन्हा सुरू करावी लागेल, जेणेकरून जलाशयांमध्ये पुनर्भरण करून साठवता येईल. पावसावर आधारित शेती, नैसर्गिक शेतीसोबतच दुष्काळ प्रतिरोधक बियाणांच्या वापरालाही प्रोत्साहन द्यायला हवे. रसायने आणि कीटकनाशकांचा वापर कमीत कमी ठेवला पाहिजे, त्यामुळे जल-प्रदूषण टाळता येईल. जलस्रोत जंतूमुक्त करण्यासाठीही व्यवस्था असायला हवी. पाण्याचा पुनर्वापर करणेदेखील अत्यंत म हत्त्वाचे आहे.

**-मच्छिंद्र ऐनापुरे,**
जत, जि. सांगली

# एप्रिल फुल



आज १ एप्रिल आजचा दिवस संपूर्ण दिवस जगात एप्रिल फुल म्हणून साजरा केला जा-तो. फुल ( षेश्र ) म्हणजे मूर्ख. या दिवशी लोक एकमेकांना मूर्ख बनवतात. आपणही या दिवशी कोणाला तरी मूर्ख बनवलेच असेल. दुसऱ्याला मूर्ख बनवून एप्रिल फुल करण्याचा आनंद यापण सगळ्यांनीच लुटला असेल.

एप्रिल फुल या प्रथेची सुरवात कधी झाली हे निश्चितपणे सांगता येणार नाही. याबाबत अनेक कथा प्रचलित आहे त्यातल्या एका फ्रेंच कथेनुसार पंधराव्या शतकात फ्रान्समध्ये ज्युलियन कॅलेंडर वापरत होते त्या कॅलेंडरप्रमाणे नववर्षाची सुरवात २५ मार्च ते १ एप्रिल या आठवड्यात होत असे.

या आठवड्यात सगळे लोक वसंत ऋतूचे स्वागत आणि १ एप्रिलला नववर्ष साजरे करीत असत. मात्र १५८२ सालापासून फ्रेंच लोकांनी ग्रेगरियन कॅलेंडर स्वीकारले. या कॅलेंडर नुसार १ जानेवारीपासून पासून नववर्षाचा प्रारंभ होतो. हा बदल तेथील ग्रामीण भागातील अशिक्षित लोकांना माहीत नव्हता ते १ एप्रिलाच नववर्ष साजरा करीत त्यामुळे या लोकांना तेथील उच्चभ्रू , सुशिक्षित लोक मूर्ख (fool) म्हणत. जे लोक १ एप्रिलला नववर्ष साजरा करीत त्यांना फ्रांसमध्ये एप्रिल फुल असे संबोधले जाई. अशा तऱ्हेने १ एप्रिलला एप्रिल फुल करण्याची प्रथा जगभर पसरली. फ्रेंच लोक भारतात आल्यानंतर भारतातही ही प्रथा सुरू झाली. १ एप्रिलला आपले मित्र, नातेवाईक यांना एप्रिल फुल करण्याची प्रथा आता चांगलीच रुजली आहे. काळानुसार बदल होत आता लोक फेसबुक, व्हाट्सएप, ट्विटर या सोशल मीडियांच्या माध्यमातून एकमेकांना एप्रिल फुल करीत आहेत.

आपल्या मित्रांना, नातेवाईकांना एप्रिल फुल करून त्यातून मिळणारा आनंद हा क्षणिक असला तरी तो आजच्या धकाधकीच्या जीवनात मोलाचा आहे. दुसऱ्यांना एप्रिल फुल बनवताना प्रत्येकाने स्वतःमधील वाईट प्रवृत्तीलाही एप्रिल फुल बनवावे. दररोज उशिरा उठण्याच्या सवयीला लवकर उठून व्यायाम करून एप्रिल फुल करावे. दररोज मोबाईल वापराच्या सवयीला एप्रिल फुल करून एखादे छानसे पुस्तक वाचावे. सर्वांशी जिव्हाळ्याने वागून आपल्यातील अहंकाराला एप्रिल फुल करावे. गरजवंताला मदत करून स्वार्थाला एप्रिलफुल करावे. मोठेपणाला एप्रिलफुल करून लहान मुलांशी खेळावे. स्वतःच्या मी पणाला एप्रिलफुल करुन आम्ही बनून समाजात वावरल्यास एकमेकांविषयी असलेली कटुता कमी होईल आणि प्रत्येकाला जीवनाचा आनंद घेता येईल.

**-श्याम बसप्पा ठाणेदार**
दौंड, जि. पुणे
मो. ९९२२५४६२९५

# लोहा शहरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर शासकीय वसतिगृह, शादीखाना प्रश्न मार्गी लागणार

## आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांचा पाठपुरावा

**लोहा (प्रतिनिधी)–** लोहा शहरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर शासकीय वसतिगृह व्हावे यासाठी शासकीय जागेची उपलब्धता, तसेच मुस्लीम बांधवांच्या शादीखानाच्या जागेचा प्रश्न तत्काळ मार्गी लागावा यासाठी विधिमंडळ उपविधान समितीचे अध्यक्ष आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांचा सातत्याने पाठपुरावा सुरू आहे. जिल्हाधिकारी यांच्याकडे शहर विकासाच्या अनुषंगाने महत्वाच्या विषयावर बैठक झाली. या बैठकीत शहरातील महत्वाचे प्रश्न मार्गी लावण्या प्रकरणी चर्चा करण्यात आली. जागेचा प्रश्न लवकरच निकाली निघेल, असा विश्वास आ. चिखलीकर यांनी दिला.



विधिमंडळ उपविधी समितीचे अध्यक्ष आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या उपस्थितीत जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्याकडे बैठक पार पडली. या बैठकीसाठी जि. प. मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली, सहायक जिल्हाधिकारी (कंधार उपविभागीय अधिकारी) अनन्या रेड्डी, निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर, नगराध्यक्ष शरद पाटील पवार, लोहा तहसीलदार विठ्ठल परळीकर, कंधार तहसीलदार रामेश्वर गोरे, लोहा उपनगराध्यक्ष करीम शेख, उपनगराध्यक्ष मन्नान चौधरी (कंधार), सा. बां. विभागाचे कार्यकारी अभियंता राम गलधर, मुख्याधिकारी श्रीकांत लाळगे, मुख्याधिकारी संदीप भोळे, (कंधार) महावितरणचे कार्यकारी अभियंता चव्हाण, लघु पाटबंधारे, सार्वजनिक बांधकाम विभाग, भूमी अभिलेख, महावितरण, नगरपालिका संबंधित अधिकारी तसेच इमाम लदाफ, मार्केट कमिटीचे संचालक अण्णासाहेब पवार यांच्यासह अधिकारी व पदाधिकारी उपस्थित होते.

सामाजिक न्याय विभागाच्या वतीने लोहा शहरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर शासकीय वसतिगृह उभारण्यात येणार आहे. तसेच मुस्लीम बांधवांसाठी शादीखाना उभारण्यात येणार आहे. त्याच्या जागेचा प्रश्न या बैठकीत निकाली काढण्यात आला. त्यामुळे गेल्या निवडणुकीत आ. चिखलीकर यांनी मुस्लीम बांधवांना दिलेल्या आश्वासनाची पुर्तता होणार आहे.

माळेगाव यात्रा येथे सौर ऊर्जा प्रकल्प राबविण्यासाठी महावितरणचे ना हरकत तसेच श्रीक्षेत्र खंडोबा देवस्थान यात्रा परिसर विकास प्रसाद योजने अंतर्गत करण्यासाठी प्रस्ताव व शिफारसी शासनास पाठवणे य विषयावर सविस्तर चर्चा करण्यात आली. जिल्हा परिषदेची जागा लोकलफंड या नावाने आहे. ती जागा जिल्हा परिषदेच्या नावाने करावी यासह अनेक महत्वाच्या विषयांवर बैठकीत चर्चा झाली.

बैठकीत आ. चिखलीकर, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी संबंधित विभागप्रमुखांना तत्काळ कारवाई करण्यासंदर्भात सूचना दिल्या.

# जिल्हा पोलीस दलातील तीन फौजदार, सात सहायक फौजदार आणि एक हवालदार सेवानिवृत्त



**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्हा पोलीस दलातील तीन पोलीस उपनिरीक्षक, सात सहायक पोलीस उपनिरीक्षक आणि एक पोलीस हवालदार असे एकूण १० अधिकारी व अंमलदार नियत वयोमानानुसार दि. ३१ मार्च रोजी सेवानिवृत्त झाले आहेत.

पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव यांच्या हस्ते सर्व सेवानिवृत्तांचा पुष्पगुच्छ, शाल श्रीफळ व भेट वस्तु देवून सत्कार करण्यात आला. सर्व सेवानिवृतांनी आपल्या कुटुंबास वेळ द्यावा आणि आरोग्याची काळजी घेवून सुखी आणि आनंदी जीवन जगण्याचा सल्ला यावेळी देण्यात आला.

या निरोप समारंभास कल्याण विभागाचे पोलीस निरीक्षक जगदीश मंडलवार, पोलीस उपनिरीक्षक तथा जनसंपर्क अधिकारी जळबाजी गायकवाड यांच्यासह अनेक पोलीस अधिकारी व अंमलदार उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जिल्हा विशेष शाखेचे पोलीस निरीक्षक श्यामसुंदर टाक यांनी केले. जनसंपर्क विभागातील हवालदार हनमंत पोतदार, अंमलदार मारोती कांबळे, नरेंद्र राठोड, पोलीस कल्याण विभागातील अंमलदार सविता भिमलवाड यांनी कार्यक्रमासाठी परिश्रम घेतले.

सेवानिवृत्त फौजदार अशोक किशन बनसोडे, गौतम हनुमंतराव वाहुळे, दिगांबर किशराव डुडूळे, सहायक फौजदार राजाराम रामराव सांगळे, शैलेंद्रसिंघ हुजुरसिंघ मान, शेषराव रामधन चव्हाण, भास्कर व्यंकटराव मुंढे, गोविंद रामचंद्र साबळे, देवराव शेषराव वडजे, आणि हवालदार संजय भुजंगराव कदम यांचा समावेश आहे.

# कथाकार प्रणव शास्त्री धानोरकर यांच्या श्रीराम कथेला नांदेडात प्रतिसाद

## माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती

**नांदेड (प्रतिनिधी)–** महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध कथाकार प्रणव शास्त्री धानोरकर यांची नांदेड शहरातील विवेकनगर भागातील मारुती मंदिरात श्रीराम कथा सुरू आहे. या श्रीराम कथेला भाविकांचा प्रतिसाद मिळत असून, महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा राज्यसभेचे खा. अशोकराव चव्हाण, माजी आ. अमरनाथ राजूरकर, ओमप्रकाश पोकर्णा, प्रसिद्ध कीर्तनकार प्रवीण दिवाकर, हभप विक्रम महाराज नांदेडकर, शिक्षक संघाचे पांडुरंग बच्चेवार यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती होती.



यावेळी गोविंददेव गिरी महाराज यांचे कृपांकित शिष्य प्रणव शास्त्री धानोरकर यांनी आपल्या अमृतवाणीतून समाज प्रबोधन केले.

# भाजपा सोशल मीडिया लोहा शहर मंडळ संयोजकपदी केशव पाटील पवार



**लोहा (प्रतिनिधी)–** भारतीय जनता पार्टी सोशल मीडिया लोहा शहर मंडळ संयोजकपदी लोहा येथील भाजपाचे कार्यकर्ते केशव पाटील पवार यांची नियुक्ती केली आहे.

सामाजिक, राजकीय व मीडिया क्षेत्रात सदा अग्रेसर असणारे लोहा न. प. च्या निवडणुकीत भाजपाच्या प्रचारात अग्रेसर असणारे लोहा येथील भाजपाचे कार्यकर्ते केशव पाटील पवार यांच्या कार्याची दखल भाजपा पक्ष श्रेष्ठींनी घेऊन त्यांच्यावर भाजपाच्या लोहा शहर सोशल मीडिया संयोजकपदी नियुक्ती केली आहे. या निवडीचे पत्र भाजपाचे सोशल मीडिया जिल्हा संयोजक संजीव पांचाळ शहापूरकर यांनी केशव पाटील पवार यांना दिले आहे.

लोहा येथील पत्रकार केशव पाटील पवार यांची भाजपा लोहा शहर मंडळ सोशल मीडिया संयोजकपदी निवड झाल्याबद्दल त्यांचे अनेकांनी अभिनंदन केले आहे.

# ‘माझी शाळा – हरित शाळा’ उपक्रमात विद्यार्थ्यांचा सक्रीय सहभाग

**नांदेड (प्रतिनिधी)** –वृक्षमित्र फाऊंडेशन नांदेड व पी.एम.श्री जिल्हा परिषद हायस्कूल तामसा ता. हदगाव यांच्या संयुक्त विद्यमाने शाळेत निसर्गवेध पर्यावरण परिसंवाद व पर्यावरणपूरक वृक्षांची लागवड कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी घेण्यात आलेल्या माझी शाळा हरित शाळा उपक्रमात विद्यार्थ्यांनी सहभाग दर्शविला.

या कार्यक्रमात मार्गदर्शक म्हणून वृक्षमित्र संतोष मुगटकर यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना वृक्ष लागवड व संगोपनाबाबत विस्तृतपणे मार्गदर्शन करीत प्रश्नोत्तर स्वरूपात विद्यार्थ्यांशी संवाद साधला. योग्य उत्तर देणाऱ्या विद्यार्थ्यांस प्रोत्साहनपर वृक्ष व पुस्तक भेट दिले व कार्यक्रमात मार्गदर्शन करताना विद्यार्थ्यांकडून शालेय वृक्ष लागवड निगा संवर्धनाचे वचन घेत जून २०२६ मध्ये प्रशालेस दोनशे वृक्ष भेट देण्याचे आश्वासन दिले.



जिल्ह्यातील हरित क्षेत्र वाढण्यासाठी विद्यार्थ्यांचा सहभाग घेतला जाईल, असे प्रतिपादन केले.

हा कार्यक्रम यशस्वीतेसाठी तामसा प्रशालेचे सक्षम पर्यवेक्षक एल. बी. चव्हाण यांनी सहकारी शिक्षक कोळगीरे, कांबळे, कंधारे, सय्यद, अत्तार, मुक्कनवार, सुतार, सौ. कोंडेकर, सौ. पाटील, सौ. ठक्करवाड यांचे सहकार्याने आणि शाळा प्रमुख देवीदास अक्कमवाड यांनी परिश्रम घेतले.

परिसंवादानंतर शाळा परिसरात शालेय समितीचे अध्यक्ष गजानन कल्याणकर, सदस्य संजय सोमेवाड, सचिन तांदळे, पत्रकार देशमुख, सर्व विद्यार्थी, मुख्याध्यापक, शिक्षक तसेच वृक्षमित्र फाउंडेशन नांदेडचे वृक्षमित्र शैलेंद्र क्षीरसागर, गणेश साखरे, अजय सोनकांबळे यांनी वृक्ष लागवड केली.

# महाराष्ट्र पुरोगामी शिक्षक संघटनेच्या हिमायतनगर तालुक्याची कार्यकारिणी जाहीर



**नांदेड (प्रतिनिधी)–** महाराष्ट्र पुरोगामी प्राथमिक शिक्षक संघटना जि. शा. नांदेडची बैठक नांदेड येथे नुकतीच घेण्यात आली. या बैठकीत महाराष्ट्र पुरोगामी शिक्षक संघटनेच्या हिमायतनगर तालुक्यातील कार्यकारिणी जाहीर करण्यात आली.

बैठकीच्या अध्यक्षस्थानी राज्य कोषाध्यक्ष जी. एस. मंगनाळे तर प्रमुख उपस्थिती विभागीय उपाध्यक्ष एकाळे समर्थ, जिल्हाध्यक्ष गोविंद मोरे, जिल्हा सरचिटणीस मनोहर पेठकर, जिल्हा कोषाध्यक्ष नागनाथ बसापुरे, प्रमुख सल्लागार बी. एन. कांबळे, कार्यालयीन सचिव एस. पी. पिंपळे, जिल्हा उपाध्यक्ष व्ही. व्ही. आमनवाड, जिल्हा उपाध्यक्ष मनोहर शितळे, हदगाव तालुकाप्रमुख सतीश भंडारे, कंधार तालुका शिक्षक नेते बस्वदे, अर्धापूर तालुका प्रभारी मोहम्मद अकबर, देगलूर प्रभारी निर्मल आदी उपस्थित होते.

# इंदिरा गांधी हायस्कूलमध्ये पार पडला विद्यार्थी, पालक मेळावा

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)** –श्री शारदा भवन शिक्षण संस्था संचालित इंदिरा गांधी हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज, सिडको येथे दहावी बोर्ड परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांचा विद्यार्थी – पालक मेळावा मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक जी. एम. शिंदे यांची उपस्थिती होती. यावेळी उपमुख्याध्यापक सौ. देशमुख, यशवंत महाविद्यालय नांदेड येथील प्रा. कंचटवार, प्रा. धर्मिले, प्रा. कदम आदींची प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कनिष्ठ महाविद्यालयीन पर्यवेक्षक प्रा. डॉ. रमेश नांदेडकर यांनी मेळावा घेण्यामागची उद्देश भूमिका व भविष्यातील विद्यार्थी विकास योजना या विषयावर विचार मांडले.

तसेच प्रा. एस. एल. कदम यांनी विद्यार्थ्यांना यशवंत महाविद्यालयातील जिनियस बॅचबद्दल विस्तृत मार्गदर्शन केले.तसेच प्रा. एस. एन. कंचटवार व प्रा. एम. के. धर्मिले यांनी इयत्ता अकरावी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया कशी पार पडेल



याबद्दल सविस्तर मार्गदर्शन केले. तर प्रा. डॉ. एस. डी. शिंदे यांनी विद्यार्थ्यांना दहावीनंतर करियरच्या कोणत्या वाटा याबद्दल मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ.संजय देशमुख यांनी तर उपस्थितांचे आभार प्रा. नितीन दारमोड यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. डॉ. आर. टी. नांदेडकर, गरडअण्णा सज्जन, अंबुलगेकर, बायस, शिंदे, गजले पाटील व दहावी वर्गातील सर्व वर्गशिक्षक, प्रा. डॉ. एस. डी. शिंदे, प्रा. सौ. झेड. एस. फाजगे, प्रा. डॉ. एस. एम. देशमुख, प्रा. सौ. एस. डी. कोठोळे, प्रा. एस. आर. सातानुरे, प्रा. एन. डी. दारमोड, प्रा. डी. एम. मोरे, प्रा. के. जी. पुयड, प्रा. एस. के. हापगुंडे, लिपीक एस. बी. पाताळे, एस. एन. कुकूटला, सेविका महादेवी स्वामी आदींनी अथक परिश्रम घेतले.

# बी. डी. मुंडे व व्ही. जी. राऊतवार यांना नियमबाह्य पद्धतीने दिलेला पदभार काढण्याची मागणी

**नांदेड (प्रतिनिधी)–** महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ उद्योग भवन येथे बी. डी. मुंडे यांच्या पदाला कोणतीही वैध मान्यता नसताना त्यांना सहायक क्षेत्र व्यवस्थापक पदावर नियुक्ती देण्यात आली आहे. तसेच व्ही. जी. राऊतवार यांना वित्त अधिकारी या पदाचा अतिरिक्त कार्यभार देण्यात आला आहे. या दोघांचेही कार्यभार काढून टाकण्यात यावा, अशी मागणी ॲड. संतोष गायकवाड यांनी एका निवेदनाद्वारे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या कार्यकारी अभियंत्याकडे केली आहे.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ उद्योग भवन नांदेड येथे सहायक क्षेत्र व्यवस्थापक या पदावर बी. डी. मुंडे यांना कोणतीही वैध मान्यता अथवा मंजूर पद उपलब्ध नसताना नियुक्ती देण्यात आली आहे. हे पद अस्तित्वात नसताना नियमबाह्य पद्धतीने हे आदेश काढण्यात आले आहेत. तसेच या नियुक्ती प्रक्रियेबाबत कोणतेही वैध, अधिकृत लेखी कागदपत्रे उपलब्ध नाहीत. प्रशासकीय मान्यता यांचा कुठलाही ठोस आधार नाही. ही नियुक्ती पूर्णपणे मनमानी, अपादर्शक व नियमबाह्य पध्दतीने करण्यात आली असून, या प्रकरणाची सखोल चौकशी करुन जबाबदार अधिकाऱ्यावर शिस्तभंग व दंडात्मक कारवाई करण्यात यावी, असेही ॲड. संतोष गायकवाड यांनी निवेदनात नमूद केले आहे.

# दिलीप ठाकूर यांच्या पुढाकारातून ‘केरला स्टोरी पार्ट टू’ चे पाचही मोफत शो हाऊसफुल

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)** –हिंदू मुलींमध्ये जागृती व्हावी म्हणून ॲड. दिलीप ठाकूर यांच्या पुढाकारातून ‘केरला स्टोरी पार्ट टू’ या चित्रपटाचे मोफत पाच शो प्रदर्शित करण्यात आले. या उपक्रमाची पक्षाने दखल घेतली असून, त्यांना पद्म पुरस्कार मिळावा म्हणून राज्यपालांमार्फत शिफारस करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याची ग्वाही भाजपा प्रदेश उपाध्यक्ष ॲड. चैतन्यबापू देशमुख यांनी दिली. संत बाबा बलविंदरसिंघ यांच्या हस्ते पहिल्या शोचे उद्घाटन झाल्यानंतर चित्रपटाला पहाटेपासूनच मुलींचा अभूतपूर्व प्रतिसाद मिळून सर्व शो हाऊसफुल झाले.

सोमवार, दि. ३० मार्च रोजी पीव्हीआर सिनेमा येथे भाजपा नांदेड महानगर, लायन्स क्लब नांदेड सेंट्रल आणि अमरनाथ यात्री संघ यांच्या संयुक्त विद्यमाने सकाळी ७ ते २ दरम्यान विविध स्क्रीनवर पाच शो



प्रदर्शित करण्यात आले. या उपक्रमात मुलींचा उत्साह दिसून होता.

विविध शोचे उद्घाटन संत बाबा बलविंदरसिंघ, ॲड. चैतन्यबापू देशमुख, मानिनी नांदेडकर, सुयोग कवटगी, शंकर वानेगावकर, अनिल चिद्रावार यांच्या हस्ते रिबीन कापून करण्यात आले. यावेळी नगरसेविका अमृता बजरंगसिंह ठाकूर, संगिता चारुदत्त चौधरी, मिली मोदी, स्नेहलता जायस्वाल, अनिलसिंह हजारी, राजेश केंद्रे, चंचलसिंह जट, वसुबेन पटेल, लक्ष्मी वाघमारे यांची प्रमुख उपस्थिती होती.

मोफत तिकीट देण्यासाठी सहकार्य करणारे आशिष काबरा, श्रीराम मेडेवार, राज मड्डी, संजय केंद्रे, दिलीप मोदी, सतीश सुगनचंद शर्मा, प्रशांत दामरगिरे, चारुदत्त चौधरी, प्रा. संजय पाटील, आकाश येमेकर, इंजि. जयचंद्र तत्तापुरे, प्राचार्य दीपक बच्चेवार, डॉ. प्रणद जोशी, सुरेश पळशीकर, पप्पू रिझवानी, इंजि. द्वारकादास अग्रवाल, सिद्राम दाडगे, दासराव कंदकुर्ते, राजेश भराडिया, विजय पोषट्टी, मुकुंद कुलकर्णी, नागनाथअप्पा येरगे, व्यंकटेश मुखेडकर, सौ. उज्ज्वला गुरसुडकर, श्रीनिवास अमीलकंठवार, व्यंकट अन्नदाते, ॲड. संदीप साखरे, कल्पना पुर्नाले, धोंडिबा बेंद्रीकर पाटील, सुरेश खुळखुळे, जयकुमार, डॉ. अमोल चवरे, सुरज घोगरे, रामेश्वर वाघमारे यांचा याप्रसंगी सत्कार करण्यात आला.

यावेळी उपस्थित सर्व मुलींचे औक्षण संध्या छापरवाल व सविता काबरा यांनी केले, तर पुष्पवृष्टी शिवा लोट, सुरेश शर्मा व शिवचरण लोट यांनी केली. उषा गवारे व पल्लवी नगारे यांनी साकारलेल्या आकर्षक रांगोळीने सर्वांचे लक्ष वेधले. कार्यक्रमात सर्व मुलींनी ‘लव्ह जिहाद’ विरोधात सजग राहण्याची प्रतिज्ञा घेतली. प्रकाश उंटवाले व अमित शिवपुजे यांनी स्मृतीचिन्ह देऊन सौ. जयश्री ठाकूर व ॲड. दिलीप ठाकूर यांचा सन्मान केला. धीरज स्वामी यांनी सूत्रसंचालन केले, तर राजेशसिंह ठाकूर यांनी आभार प्रदर्शन केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सरदार जयदेवसिंघ, अरुण काबरा, जगतसिंह ठाकूर, प्रभुदास वाडेकर, गणेशसिंह परमार, सुरेश निलावार, हितेश टाक, आकाश अग्रवाल, गिरीश पटवारी, संतोष भारती, शुभम साकळे, देवदत्त देशपांडे, गणेश कानगुले, बालाजी वाघमारे, संजय कोकुलवार, अशोक गिते, मनिषा तांबोळी, बाळू जोशी, वासुदेव बक्षी, गणेश देशमुख, जयंत देशपांडे, किरण देशपांडे, विश्वनाथ स्वामी यांनी परिश्रम घेतले.

चित्रपट पाहिल्यानंतर अनेक मुलींनी उत्स्फूर्त प्रतिक्रिया व्यक्त दिल्या. या उपक्रमामुळे सामाजिक भान, सांस्कृतिक मूल्ये आणि जागरूकतेचा संदेश मुलींमध्ये प्रभावीपणे पोहोचल्याने संयोजक दिलीप ठाकूर यांच्यावर सर्व स्तरातून कौतुकाचा वर्षाव होत आहे.

# डॉ. मोहसीन खान यांना महाराष्ट्र शासनाचा राज्यस्तरीय व्यसनमुक्ती पुरस्कार प्रदान

**नांदेड (प्रतिनिधी)–** येथील पत्रकार व सामाजिक कार्यकर्ते डॉ. मोहसीन खान मुजीब पाशा यांना महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागातर्फे दिला जाणारा ‘राष्ट्रपिता महात्मा गांधी राज्यस्तरीय व्यसनमुक्ती सेवा पुरस्कार’ प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार केंद्रिय सामाजिक न्यायमंत्री रामदास आठवले यांच्या हस्ते गुरुवार, दि. २६ मार्च रोजी सकाळी १० वाजता मुंबई येथील यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान सभागृह, नरिमन पॉईंट येथे आयोजित समारंभात प्रदान करण्यात आला.

सन २०२१–२०२२ या वर्षासाठीचा हा पुरस्कार असून, डॉ. मोहसीन खान यांना सन्मानपत्र, स्मृतिचिन्ह, शाल व श्रीफळ देऊन गौरविण्यात आले. त्यांच्या या यशामुळे बिलोली तालुक्याच्या



सामाजिक व पत्रकारिता क्षेत्रात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

डॉ. खान हे गेल्या अनेक वर्षांपासून व्यसनमुक्ती, पर्यावरण, शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात कार्यरत आहेत. तसेच पत्रकारितेच्या माध्यमातून व्यसनाधीनता निर्मूलनासाठी त्यांनी सातत्याने लेखन करून जनजागृती केली आहे. या पुरस्कार वितरण सोहळ्याला प्रमुख अतिथी म्हणून विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट, आ. तुषार राठोड, माजी गृहमंत्री सिध्दराम म्हेत्रे, उपसचिव रविंद्र गोरवे तसेच समाजकल्याण विभागाचे सर्व अधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सामाजिक न्याय विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे यांनी केले. सूत्रसंचालन हर्षल पाटील व धनश्री प्रधान यांनी केले. शेवटी उपस्थितांचे आभार समाजकल्याण आयुक्त दीपा मुधोळ मुंडे यांनी मानले.

निरोगी आरोग्याचा कानमंत्र

# निरामय




## ऊर्जा अन् शक्ती वाढवण्यासाठी व्हिटॅमिन बी 12 युक्त पदार्थ आवश्यक

**व्हिटॅमिन बी१२ हे एक प्रमुख पोषक तत्व आहे जे आजकाल लोकांमध्ये कमी प्रमाणात आढळते. अनेकदा रुग्णांमध्ये व्हिटॅमिन बी१२ च्या कमतरतेची लक्षणे दिसतात, त्यापैकी सर्वात सामान्य म्हणजे थकवा आणि अशक्तपणा. शक्ती आणि ऊर्जा वाढवण्यासाठी तुम्ही व्हिटॅमिन बी१२ ने समृद्ध असलेले पदार्थ खाल्ले पाहिजेत. सर्वात चांगली गोष्ट म्हणजे हे व्हिटॅमिन शाकाहारी आणि मांसाहारी दोन्ही पदार्थांमध्ये उपलब्ध आहे. हे पोषक तत्व दूध, दही, चीज, अंडी, चिकन आणि मासे खाऊन मिळवता येते. पण तुम्हाला माहित आहे का की कोणत्या पदार्थांमध्ये व्हिटॅमिन बी१२ (कोबालामिन) सर्वाधिक प्रमाणात असते?**

- व्हिटॅमिन बी१२ महत्त्वाचे का आहे? : लाल रक्तपेशींची निर्मिती, मज्जासंस्थेचे आरोग्य आणि ऊर्जा निर्मितीसाठी व्हिटॅमिन बी१२ आवश्यक आहे. व्हिटॅमिन बी१२ च्या कमतरतेने ग्रस्त असलेल्या लोकांना अनेकदा सततचा थकवा आणि अशक्तपणा यांसारखी लक्षणे जाणवतात, ज्याकडे कामाचा ताण किंवा झोपेची कमतरता म्हणून अनेकदा दुर्लक्ष केले जाते. शाकाहारी पदार्थांमध्ये कोबालामिन मर्यादित प्रमाणात आढळत असल्याने कठोर शाकाहारी आणि अनियमित आहार घेणाऱ्यांना याची कमतरता होण्याचा धोका जास्त असतो.
- शक्ती आणि ऊर्जेसाठी बी१२ आवश्यक : व्हिटॅमिन बी१२ शरीराला हिमोग्लोबिन तयार करण्यास मदत करते. हे हिमोग्लोबिन शरीराच्या प्रत्येक भागापर्यंत ऑक्सिजन पोहोचवते. म्हणून, जेव्हा बी१२ ची पातळी कमी होते, तेव्हा शरीरातील ऑक्सिजनचा पुरवठा देखील कमी होतो, ज्यामुळे ऊर्जेची पातळी कमी होते. जेव्हा कोबालामिन कमी असते, तेव्हा स्नायू लवकर थकतात. रुग्णांना हलके काम केल्यानंतरही अशक्तपणा जाणवू शकतो. हा सामान्य थकवा आहे असे समजून याकडे कधीही दुर्लक्ष करू नये.
- मज्जासंस्थेवर कसा परिणाम होतो? : बी१२ हे जीवनसत्व मज्जातंतूंच्या संरक्षणासाठी देखील आवश्यक आहे. याच्या कमतरतेमुळे हात आणि पायांमध्ये मुंग्या येणे आणि बधिरता येणे, तसेच तोल सांभाळण्यास अडचण येऊ शकते. जर कमतरता दीर्घकाळ टिकून राहिली, तर मज्जातंतूंच्या नुकसानीचा धोकाही वाढतो.
- व्हिटॅमिन बी१२ च्या कमतरतेची कारणे? : पूर्णपणे शाकाहारी आहार, गॅस्ट्रायटीससारख्या पोटाच्या समस्या, वृद्धापकाळामुळे, विशिष्ट औषधांचा दीर्घकाळ वापर, जंक फूड आणि असंतुलित आहार घेणे.
- कोणत्या लक्षणांकडे आणि चिन्हांकडे दुर्लक्ष करू नये? : नेहमी थकल्यासारखे आणि अशक्त वाटणे, चक्कर येणे किंवा डोके हलके वाटणे, स्मरणशक्ती कमी होणे, हात आणि पायांना मुंग्या येणे, चिडचिड होणे किंवा मनःस्थितीत अचानक बदल होणे.
- कोणते शाकाहारी पदार्थ खावेत? : दूध आणि दही, चीज, सोया उत्पादने, व्हिटॅमिनयुक्त तृणधान्ये.
- कोणते मांसाहारी पदार्थ खावेत? : अंडी, मासे, चिकन, प्राण्यांचे यकृत (व्हिटॅमिन बी१२ चा सर्वोच्च स्त्रोत).

## वारंवार जांभई येणे कोण-कोणत्या समस्यांचे संकेत?



### डॉक्टरांकडून प्रतिबंधात्मक उपाय जाणून घ्या...

**जर तुम्ही कोणासमोर वारंवार जांभई देत असाल, तर ते तुम्हाला विचारू शकतात की तुमची झोप पुरेशी झाली नाही का. कधीकधी हे सामान्य आहे, परंतु जर हे दररोज आणि वारंवार होत असेल, तर त्याचे कारण शोधणे महत्त्वाचे आहे...**

रात्रीची पूर्ण झोप घेऊनही जर तुम्हाला सकाळी उठल्यावर, ऑफिसमध्ये काम करताना किंवा अभ्यास करताना वारंवार जांभई येत असेल, तर हे एक लक्षण असू शकते की तुमच्या शरीराला जागे राहण्यास किंवा पुरेसा ऑक्सिजन टिकवून ठेवण्यास अडचण येत आहे. तुमच्या दैनंदिन सवयींमध्ये किंवा आरोग्यामध्ये काही गंभीर समस्या असू शकतात ज्याकडे लक्ष देण्याची गरज आहे.



### वारंवार जांभई येणे सामान्य नाही...

झोपेशी संबंधित समस्यांमुळे देखील वारंवार जांभई येऊ शकते. स्लीप ॲप्निया, नार्कोलेप्सी आणि दीर्घकालीन निद्रानाश यांसारखे झोपेचे विकार शरीराला गाढ, शांत झोप मिळण्यापासून रोखतात. स्लीप ॲप्निया असलेल्या व्यक्ती अनेकदा झोपेत श्वास घेणे थांबवतात, ज्यामुळे त्यांच्या ऑक्सिजनची पातळी कमी होते आणि त्यांना दिवसा खूप थकवा जाणवतो. या लोकांना दिवसा झोपही येते.

### तणाव, मानसिक थकव्यामुळे जांभई

आपल्याला जांभई येते कारण आपले शरीर मेंदू आणि शरीराच्या इतर भागांना ऑक्सिजन पुरवण्याचा प्रयत्न करत असते. बहुतेक लोकांना हे माहीत नसते की तणाव आणि मानसिक थकव्यामुळे देखील वारंवार जांभई येऊ शकते. जेव्हा मेंदू सतत मानसिक तणावाखाली असतो, तेव्हा तो जास्त ऊर्जा आणि ऑक्सिजन वापरतो. जेव्हा आपल्या शरीराला ऑक्सिजनची गरज असते तेव्हा जांभई येते. जांभईद्वारे, शरीर ऑक्सिजनचा संचार वाढवण्याचा आणि लक्ष केंद्रित ठेवण्याचा प्रयत्न करते.

### तुम्हाला वारंवार जांभई का येते?

ऑक्सिजनची पातळी, मेंदूचे तापमान आणि सतर्कता नियंत्रित करण्याकडे जांभई लक्ष वेधते. मात्र वारंवार जांभई येण्याचे मुख्य कारण थकवा आणि अपुरी झोप असू शकते.

झोपेचा अभाव : जेव्हा शरीराला पुरेशी विश्रांती मिळत नाही, तेव्हा मेंदू जांभया वाढवून सतर्क राहण्याचा प्रयत्न करतो. खराब झोप, झोपेच्या आणि जागे राहण्याच्या वाईट सवयी, झोपण्यापूर्वी जास्त वेळ स्क्रीन पाहणे या सर्वांमुळे दिवसा झोप येणे आणि वारंवार जांभई येणे या समस्या उद्भवू शकतात.

- संक्रामक जांभई : जेव्हा तुमच्यासमोर कोणी जांभई देते, तेव्हा तुम्हालाही जांभई येऊ शकते. याला 'संक्रामक जांभई' म्हणतात. हे मेंदूतील मिरर न्यूरॉन्समुळे होते. मिरर न्यूरॉन्स इतरांच्या वर्तनाचे अनुकरण करतात.
- निर्जलीकरण : खूप कमी पाणी प्यायल्याने देखील जांभई येऊ शकते. जेव्हा आपल्या शरीरात द्रवपदार्थांची कमतरता असते, तेव्हा संवाद साधण्यात अडथळा येतो आणि आपल्याला लवकर थकवा येतो.

### जांभई कोणत्या आरोग्य समस्या दर्शवते?

वारंवार जांभई येणे हे शरीर आणि मन असामान्य स्थितीत असल्याचे लक्षण आहे. सर्वप्रथम त्याचे कारण ओळखणे महत्त्वाचे आहे. वारंवार जांभई येणे हे अनेकदा आरोग्य समस्यांचे लक्षण असू शकते, जसे की...

- **रक्तातील ऑक्सिजनची कमतरता**
- **स्लीप ॲप्निया**
- **नार्कोलेप्सी**
- **दीर्घकालीन निद्रानाश**
- **मानसिक थकवा**

### जांभई टाळण्याचे मार्ग

- **जांभई टाळणे सोपे आहे. मदत म्हणून, जीवनशैलीत हे बदल करा:**
- **पुरेशी झोप घ्या**
- **तणाव टाळा**
- **दिवसभर सक्रिय राहा**
- **नियमित व्यायाम करा**
- **शरीरात पाण्याची कमतरता होऊ देऊ नका**
- **झोपण्यापूर्वी जड जेवण टाळा**



### आपल्या शरीराचे संकेत समजून घ्या...

जांभई येणे ही सहसा गंभीर बाब नसते, परंतु जर ती वारंवार किंवा कोणत्याही कारणाशिवाय येत असेल, तर तुम्ही त्याकडे लक्ष दिले पाहिजे. तुमचे शरीर तुम्हाला काहीतरी सांगण्याचा प्रयत्न करत असू शकते. ते कदाचित सांगत असेल की तुम्हाला विश्रांती, ऑक्सिजन किंवा आरोग्य तपासणीची गरज आहे. जर तुम्हाला वारंवार जांभई येत असेल, तर त्याकडे दुर्लक्ष करू नका. तुमचे शरीर तुम्हाला काय सांगण्याचा प्रयत्न करत आहे, हे समजून घेण्याचा प्रयत्न करा.

## अंडाशयाच्या कर्करोगाला का म्हणतात 'सायलेंट किलर'?


### कोणतीही दृश्य लक्षणे नसतात का?



**अंडाशयाच्या कर्करोगाला अनेकदा 'सायलेंट किलर' (शांतपणे जीव घेणारा) म्हटले जाते. असे नाही की याची कोणतीही लक्षणे नसतात, तर त्याची सुरुवातीची लक्षणे इतकी सौम्य, किरकोळ किंवा पचनसंस्थेच्या किंवा हार्मोनल समस्यांसारखी असतात की ती अनेकदा लक्षात येत नाहीत. महिलांमध्ये या धोकादायक आजाराचे निदान प्रगत अवस्थेत होते, कारण त्याची चेतावणी देणारी लक्षणे इतकी सामान्य असतात की अनेकदा त्यांना इतर आजार समजण्याची चूक केली जाते. ही लक्षणे लवकर ओळखल्यास अंडाशयाच्या कर्करोगावर प्रभावी उपचार होऊ शकतात...**

- सतत पोट फुगणे : जेवणानंतर अधूनमधून पोट फुगणे सामान्य आहे. तथापि, जर एखाद्या महिलेला तिच्या पोटात सतत जडपणा किंवा सूज जाणवत असेल, तर ते एक गंभीर चेतावणीचे लक्षण असू शकते. सामान्य पोट फुगण्यापेक्षा वेगळे, हे पोट फुगणे आठवडे टिकू शकते आणि हळूहळू वाढू शकते.
- ओटीपोटात आणि पोटात वेदना : पोटाच्या खालच्या भागात किंवा ओटीपोटात होणाऱ्या वेदना किंवा अस्वस्थतेकडे दुर्लक्ष करू नये. महिला अनेकदा या वेदनांना मासिक पाळीच्या वेदना किंवा पचनाच्या त्रासाची वेदना समजतात. तथापि, जर वेदना सतत होत असेल आणि त्याचे कारण अस्पष्ट असेल, तर तुम्ही ताबडतोब डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.
- लवकर पोट भरणे : जर तुम्हाला लवकर पोट भरल्यासारखे वाटत असेल किंवा कोणत्याही स्पष्ट कारणाशिवाय भूक कमी झाल्याचा अनुभव येत असेल, तर हे एखाद्या अंतर्निहित समस्येमुळे असू शकते. हे अंडाशयाच्या ट्यूमरमुळे (गाठीमुळे) होणाऱ्या दाबामुळे किंवा द्रवपदार्थाच्या संचयनामुळे असू शकते.
- शौचाच्या सवयींमध्ये बदल : बद्धकोष्ठता, अतिसार किंवा अनियमित शौचासारख्या पोटाच्या समस्या अंडाशयाच्या कर्करोगाची सुरुवातीची लक्षणे असू शकतात. या समस्या अनेकदा पचनसंस्थेच्या समस्यांमुळे उद्भवतात, ज्यामुळे अंडाशयाच्या कर्करोगाचे निदान होण्यास विलंब होऊ शकतो.
- वारंवार लघवी होणे : लघवी करण्याची तीव्र इच्छा होणे किंवा मूत्राशयावर दाब जाणवणे हे देखील अंडाशयाच्या कर्करोगाचे लक्षण असू शकते. असे घडते कारण ट्यूमर मूत्राशयासारख्या आजूबाजूच्या अवयवांवर दाब टाकतो.
- अकारण वजन कमी होणे किंवा वाढणे : पोटात पाणी साचल्यामुळे वजन कमी होणे किंवा वाढणे हे देखील या कर्करोगाचे सुरुवातीचे लक्षण असू शकते. जर तुमच्या वजनात असा अचानक बदल झाला, तर त्याकडे दुर्लक्ष करू नका आणि डॉक्टरांचा सल्ला घ्या.
- सततचा थकवा : तुम्हाला सतत थकल्यासारखे वाटते का? हे अंडाशयाच्या कर्करोगाचे लक्षण असू शकते, म्हणून तुमच्या डॉक्टरांशी नक्की बोला. हा थकवा शरीराच्या आजाराविरुद्धच्या अंतर्गत लढ्यामुळे येतो, जो विश्रांतीनंतरही कमी होत नाही.





### कोणत्या महिलांना जास्त धोका असतो?

- ५० वर्षांपेक्षा जास्त वयाच्या महिला, विशेषतः ज्यांची रजोनिवृत्ती झाली आहे.
- अंडाशयाचा, स्तनांचा किंवा मोठ्या आतड्याच्या कर्करोगाचा कौटुंबिक इतिहास असणे.
- जनुकीय उत्परिवर्तन असणे विशेषतः BRCA1 आणि BRCA2.
- स्वतःला कर्करोगाचा इतिहास असणे.
- वेळेआधी मासिक पाळी येणे किंवा खूप उशिरा रजोनिवृत्ती होणे.
- ज्या महिला कधीही गर्भवती राहिल्या नाहीत.

**हे लक्षात ठेवा की ज्या महिलांमध्ये हे धोक्याचे घटक नाहीत त्यांनाही अंडाशयाचा कर्करोग होऊ शकतो, म्हणून त्याच्या लक्षणांबद्दल जागरूक असणे महत्त्वाचे आहे.**


### लवकर निदान करणे कठीण का आहे?

बहुतेक महिलांसाठी अंडाशयाच्या कर्करोगासाठी कोणतीही विश्वसनीय तपासणी उपलब्ध नाही. अंडाशय पोटाच्या आत खोलवर स्थित असतात, म्हणूनच त्यामध्ये विकसित होणाऱ्या गाठी (ट्यूमर) नियमित तपासणीदरम्यान अनेकदा लक्षात येत नाहीत.

### कोणत्या चाचण्या केल्या पाहिजेत?

- अंडाशयाच्या कर्करोगाची संभाव्य लक्षणे २-३ आठवड्यांपेक्षा जास्त काळ टिकून राहिली, तर वैद्यकीय सल्ला घेणे महत्त्वाचे आहे. काही चाचण्यांद्वारे अंडाशयाच्या कर्करोगाचे निदान केले जाऊ शकते...
- पेल्विक एक्झामिनेशन (Pelvic examination) - डॉक्टरांकडून प्राथमिक निदानासाठी.
- अल्ट्रासाऊंड (ट्रान्सव्हॅजिनल सोनोग्राफी) - अंडाशयातील असामान्यता तपासण्यासाठी.
- सीए-१२५ (CA-125) रक्त चाचणी - एक ट्यूमर मार्कर जो वाढतो, जरी तो विशिष्ट नसला तरी.
- सीटी किंवा एमआरआय स्कॅन - एक इमेजिंग चाचणी जी ट्यूमरचा प्रसार दर्शवते.
- बायोप्सी किंवा शस्त्रक्रियात्मक मूल्यांकन - निदानाची पुष्टी करण्यासाठी.

जर ही लक्षणे तुम्हाला महिन्यातून १० ते १२ वेळा किंवा त्याहून अधिक वेळा त्रास देत असतील, तर तुम्ही डॉक्टरांना भेटले पाहिजे. अंडाशयाच्या कर्करोगावरील उपचार सुरुवातीच्या टप्प्यात खूप प्रभावी असतात आणि जगण्याचे प्रमाणही चांगले असते. एक स्त्री म्हणून, घरगुती जबाबदाऱ्या सांभाळताना तुम्ही तुमच्या आरोग्याकडे लक्ष दिले पाहिजे. काही त्रास जाणवल्यास डॉक्टरांचा सल्ला घेण्यास अजिबात संकोच करू नका.



# मत्स्य निर्यातीत महाराष्ट्र देशात 'नंबर २'



**मुंबई (प्रतिनिधी)**–भारताच्या नीलक्रांतीमध्ये महाराष्ट्राने पुन्हा एकदा आपले वर्चस्व सिद्ध केले असून, मत्स्य उत्पादनांच्या निर्यातीत राज्याने मोठी ऐतिहासिक कामगिरी बजावली आहे. गेल्या पाच वर्षांत महाराष्ट्राच्या समुद्री उत्पादनांच्या निर्यातीत दुपटीने वाढ झाली असून, २०२४–२५ या आर्थिक वर्षात राज्याने ७ हजार ३४३ कोटी ४० लाख रुपयांची विक्रमी निर्यात नोंदवली आहे. भारताच्या मत्स्य व्यवसायात महाराष्ट्राने मोठी झेप घेतली असून, गेल्या पाच वर्षांत राज्याच्या मत्स्य निर्यातीत कमालीची सुधारणा झाली आहे. २०२०–२१ मध्ये ३ हजार ६८४ कोटी रुपये असणारी ही निर्यात आता थेट दुप्पट होऊन २०२४–२५ या वर्षात ७ हजार ३४३ कोटी ४० लाख रुपयांवर पोहोचली आहे. केवळ आर्थिक उलाढालच नव्हे, तर निर्यातीच्या परिमाणातही मोठी वाढ झाली असून राज्याची वार्षिक निर्यात आता २.२७ लाख मेट्रिक टन इतकी झाली आहे. विशेषतः कोकण किनारपट्टीवरील मत्स्यव्यवसायाने जागतिक बाजारपेठेतील मागणी पूर्ण करण्यात सिंहाचा वाटा उचलला आहे. केंद्र सरकारच्या ताज्या आकडेवारीनुसार, या प्रभावी कामगिरीमुळे महाराष्ट्र आता मत्स्य निर्यातीत देशात दुसऱ्या क्रमांकाचे अग्रगण्य राज्य बनले असून, राज्याच्या अर्थव्यवस्थेला यातून मोठी चालना मिळाली आहे.

महाराष्ट्राच्या सागरी किनाऱ्यावरील चविष्ट मासळीने आता जागतिक बाजारपेठ काबीज केली असून, प्रामुख्याने कोकणच्या कोळंबीला परदेशी खवय्यांची मोठी पसंती मिळत आहे. राज्यातून होणाऱ्या एकूण मत्स्य निर्यातीत कोळंबी आणि गोठवलेल्या मासळीचा वाटा सर्वाधिक असून, अमेरिका आणि चीन यांसारख्या बलाढ्य देशांमध्ये महाराष्ट्रातील उत्पादनांची मोठी मक्तेदारी निर्माण झाली आहे. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील किमतींचे चढ–उतार आणि वाढता उत्पादन खर्च यांसारखी आव्हाने समोर असतानाही, महाराष्ट्राने गुजरात आणि आंध्र प्रदेश या राज्यांच्या स्पर्धेत आपले स्थान भक्कम राखले आहे. भारताच्या एकूण निर्यातीचा विचार करता, अमेरिका (२२,७२३ कोटी रुपये) आणि युरोपियन युनियन (९,४२९ कोटी रुपये) या मुख्य बाजारपेठा ठरल्या आहेत. यामध्ये कोकण किनारपट्टीवर मोठ्या प्रमाणात उत्पादित होणाऱ्या कोळंबीला सर्वाधिक मागणी असून, या 'विदेशी पाहुण्यांच्या' पसंतीमुळे राज्याच्या मत्स्य व्यवसायाला सुवर्णकाळ आला आहे.

भारतीय सागरी उत्पादनांनी जागतिक बाजारपेठेत आपली मोहोर उमटवली असून अनेक देशांमध्ये भारतीय मासळीला विक्रमी मागणी मिळत आहे. २०२४–२५ या आर्थिक वर्षाच्या आकडेवारीनुसार, भारतीय मत्स्य उत्पादनांसाठी अमेरिका ही सर्वात मोठी आणि फायदेशीर बाजारपेठ ठरली असून, एकट्या अमेरिकेला २२ हजार ७२३ कोटी रुपयांची निर्यात झाली आहे. दुसरीकडे, परिमाणाच्या बाबतीत चीनने आघाडी घेतली असून ३.९६ लाख मेट्रिक टन मासळीची आयात केली आहे, ज्याचे मूल्य १० हजार ६६८ कोटी रुपये इतके आहे.

# पॅनकार्डच्या नियमांमध्ये बदल, १ एप्रिलपासून नवे नियम होणार लागू




**मुंबई(प्रतिनिधी)**–भारताचे आर्थिक वर्ष हे १ एप्रिल ते ३१ मार्च पर्यंत असते. उद्यापासून नव आर्थिक वर्ष सुरु होतंय. आणि पॅनकार्डच्या बदलत्या नियमानुसार भारतातील मध्यम वर्ग आणि व्यापाऱ्यांच्या हिशोबाच्या गणितातही मोठे आर्थिक बदल होणार आहेत. काय असतील ते नियम, यामुळे कोणते निर्बंध येणार? कोणती कामे सोपी होणार? असे अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत.

१ एप्रिल २०२६ पासून तुम्हाला जर नवीन कार्ड तयार करायचे असल्यास आता आधार कार्ड पुरावा म्हणून देणं हे चालणार नाही, त्याऐवजी तुम्हाला बर्थ सर्टिफिकेट, पासपोर्ट किंवा १० विची मार्कशीट यासारखे नवे आणि अधिकृत कागदपत्रेही जमा करावी लागणार आहेत.

तुमची १० लाखांहून जास्तीची असणारी स्थिर मालमत्ता म्हणजे घर दुकान किंवा जमिन यांच्या खरेदी विक्रीसाठी आतापर्यंत पॅनकार्ड हे आवश्यक होत, परंतु नवीन नियमानुसार १० लाखाची मुदत ही २० लाखांपर्यंत वाढवली आहे, त्यामुळे मालमत्ता खरेदी – विक्री करणे ही प्रक्रिया जलद आणि अधिक फायदेशीर ठरणार आहे.

आता कोणतीही नवीन विमा पॉलिसी खरेदी करण्यासाठी पॅनकार्ड गरजेचं होणार आहे. मग त्यात प्रीमियम रक्कम कमी असली तरीही तसेच अकाउंट बेस्ड रिलेशनशिप अंतर्गत आता प्रत्येक पॉलिसीला पॅन कार्डने लिंक करणे गरजेचे होणार आहे. पॅनकार्डच्या या नियमामुळे विमा क्षेत्रात गुंतवणूक करण्यांसाठीची पारदर्शकता वाढणार आहे.

वाहनांसाठी नियम हे थोड्या प्रमाणात बदलण्यात आले आहेत. यापूर्वी पॅनकार्डची गरज ही वाहन खरेदी करताना प्रत्येक वेळी लागत होती. पण आता ती गरज भासणार नाही, आता पॅनकार्डची गरज केवळ ५ लाखांहून अधिक किमतीची खरेदी असणाऱ्या ग्राहकांनाच लागणार आहे. आता बजेट सेगमेंटच्या कार आणि बाइक्ससाठी ही प्रोसेस सोपी होईल.

यासाठी नियम हे थोडे शिथिल करण्यात आले आहेत. तुम्ही जर एखाद्या हॉटेल किंवा रेस्टॉरंटमध्ये मोठी कॅश पेमेंट केलीत म्हणेजच तुमचं बिल जर १ लाखांपेक्षा वर गेलं तरच तुम्हाला पॅनकार्ड दाखवाव लागणार आहेत. यापूर्वी ही मर्यादा ५०,००० रुपये होती. लग्न समारंभ किंवा एखाद्या कौटुंबिक कार्यक्रमादरम्यान कॅश देताना हा नियम फायदेशीर ठरेल.

बँकिंग मध्ये पॅनकार्ड तेव्हाच महत्वाचं ठरेल जेव्हा एका आर्थिक वर्षात १० लाखांपेक्षा जास्तची रक्कम काढली किंवा जमा केली जाईल. शिवाय लहान व्यापाऱ्यांना लहान सहान ट्रान्झॅक्शनसाठी आता पॅन कार्डची गरज लागणार नाही.

क्रेडिट कार्ड साठी पॅनकार्ड हे आवश्यक ठरणार असून आता प्रत्येक नव्या क्रेडिट कार्ड साठी अर्ज देणं अनिर्वाय ठरणार आहे. याशिवाय वर्षभरात १० लाखांहून जास्तीच्या क्रेडिट कार्ड भरण्याची माहिती थेट आयकर विभागाला पाठवली जाईल. या व्यतिरिक्त शेअर बाजार आणि म्युचल फंडमध्येही केवायसी नियमांना जास्त केले जाणार आहे.

# मध्य महाराष्ट्रात वादळी पावसाचा इशारा; नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन

**मुंबई (प्रतिनिधी)** –भारतीय हवामान विभागाच्या अंदाजानुसार मध्य महाराष्ट्रासह राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये वीज चमकणे, गारपीट आणि वादळी पावसाचा इशारा देण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर नागरिकांनी आवश्यक ती खबरदारी घेण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

हवामान विभागाने दिलेल्या सूचनांनुसार, विजेचा कडकडाट ऐकू आल्यास तात्काळ घरात किंवा सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्यावा. झाडाखाली, शेतात, पाण्याजवळ किंवा लोखंडी वस्तूंच्या जवळ उभे राहणे टाळावे. मोकळ्या जागेत मोबाईल फोनचा वापर करू नये. तसेच निवाऱ्यापासून दूर असल्यास जमिनीवर न पडता पाय एकत्र करून बसून राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

ग्रामपंचायत, पोलीस आणि आरोग्य विभागामार्फत तातडीने जनजागृती करण्याच्या सूचना प्रशासनाने दिल्या आहेत. रुग्णवाहिका व अग्निशमन दल सतर्क ठेवण्यात यावेत, तसेच शाळा, सभागृहे व सार्वजनिक इमारती सुरक्षित आश्रयस्थळ म्हणून खुले ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. हवामान खात्याचे अद्ययावत संदेश गावपातळीपर्यंत पोहोचवण्यावरही भर देण्यात आला आहे.

शेतकरी बांधवांनी विजेच्या इशाऱ्याच्या काळात शेतातील कामे टाळावीत, बांधकाम स्थळांवरील कामकाज तात्पुरते थांबवावे, तसेच यात्रास्थळे व मोठ्या जमावाचे कार्यक्रम तातडीने स्थगित करण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे, असे राज्य आपत्कालीन कार्य केंद्राच्या वतीने कळविण्यात आले आहे.

# नरहरी झिरवळ प्रकरणात पहिली कारवाई; ट्रान्सजेंडरच्या भावावर मुंबईत गुन्हा दाखल




**मुंबई(प्रतिनिधी)**–राज्याचे मंत्री नरहरी झिरवळ एका नवीन वादात सापडले आहेत. त्यांचा एक कथित व्हीडीओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणावर व्हायरल झाल्याने राजकीय वर्तुळात एकच खळबळ उडाली आहे. या प्रकरणाने आता कायदेशीर वळण घेतले असून, मुंबईतील कफ परेड पोलीस ठाण्यात यासंदर्भात गुन्हा (ऋखठ) दाखल करण्यात आला आहे. एका ट्रान्सजेंडर व्यक्तीने याप्रकरणी पोलिसांत धाव घेऊन तक्रार नोंदवली आहे. या तक्रारीची दखल घेत कफ परेड पोलिसांनी संबंधित कायद्यानुसार गुन्हा दाखल केला असून पुढील तपासाला सुरुवात केली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, ट्रान्सजेंडरच्या भावविरोधातच कफ परेड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. संबंधित ट्रान्सजेंडर व्यक्तीने नरहरी झिरवळ यांच्याकडे अन्न व औषध प्रशासनात नोकरी लावून देण्याची मागणी केली होती. ही मागणी पूर्ण न झाल्यास त्यांचा कथित व्हीडीओ सोशल मीडियावर व्हायरल करण्याची धमकी देण्यात आली होती, असा गंभीर आरोप एफआयआरमध्ये करण्यात आला आहे. हा व्हीडीओ मूळ स्वरूपात नसून तो जाणीवपूर्वक 'एडिट' करून किंवा त्यात तांत्रिक बदल करून पसरवण्यात आल्याचेही तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. कफ परेड पोलिसांनी या प्रकरणाचे गांभीर्य ओळखून भारतीय न्याय संहितेच्या कलम ७९ नुसार कोणाच्याही खाजगी आयुष्यात डोकावून त्यांच्या गोपनीयतेचा भंग करणे आणि विनयभंग करणे, तसेच कलम ३५१(१) अंतर्गत गुन्हेगारी स्वरूपाची धमकी दिल्याचा ठपका ठेवण्यात आला आहे. यासोबतच, डिजिटल माध्यमांचा चुकीच्या पद्धतीने वापर करून बदनामीकारक मजकूर आणि छेडछाड केलेले व्हीडीओ पसरवल्याबद्दल माहिती तंत्रज्ञान कायद्याच्या विविध कलमांचाही समावेश करण्यात आला आहे. तपासाअंती यातील दोषींवर कडक कारवाई होण्याचे संकेत पोलिसांनी दिले आहेत.

# गोरं होण्यासाठी पाकिस्तानी क्रीम वापरली अन् किडनी खराब, छत्रपती संभाजीनगरमध्ये तीन व्यापारी अटकेत




**छत्रपती संभाजीनगर(प्रतिनिधी)** – गोरं होण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या पाकिस्तानी क्रीम्समुळे थेट किडनीवर परिणाम होत असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. शहरात बंदी असलेल्या या सौंदर्य प्रसाधनांची सर्रास विक्री होत असल्याचं उघड झाल्यानंतर पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे.सिटी चौक पोलिसांनी धाड टाकत तब्बल ६० हजार रुपयांची क्रीम्स, साबण आणि सिरम जप्त केली असून तिघांना अटक करण्यात आली आहे.

बंदी असलेल्या पाकिस्तानी क्रीम्सची विक्री सुरू असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी शहागंज, घासमंडी आणि सिटी सेंटर मॉल परिसरातील दुकानांवर कारवाई केली. 'हायलाईट कलेक्शन', 'ओम ट्रेडर्स' आणि 'फलक इम्पोरियम' या दुकानांमधून मोठ्या प्रमाणात माल जप्त करण्यात आला. एकूण ५९ हजार ९८० रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी ताब्यात घेतला आहे.

पोलिसांच्या या कारवाईत मल्लिका, झलक, गोरे, गोल्डन पर्ल, चांदणी, उजूबा, फेस फ्रेश, नूर हर्बल, न्यू फेस ब्युटी क्रीम यांसह विविध पाकिस्तानी क्रीम्स जप्त करण्यात आल्या. तसंच पारले गोल्ड, गोरे साबण आणि मल्लिका व्हिटॅमिन–उ सिरम यांचाही समावेश आहे.

या क्रीम्सचा वापर करणाऱ्या काही तरुण–तरुणींनी आरोग्य बिघडल्याचा दावा केला आहे. गोरं होण्याच्या नादात वापरलेल्या या क्रीम्समुळे त्वचेवरच नाही तर थेट किडनीवरही परिणाम होत असल्याची माहिती तज्ज्ञ डॉक्टरांनी दिली आहे.

गोरं होण्याच्या हव्यासापोटी नागरिक स्वतःच्या आरोग्याशी खेळ करतायत का, असा गंभीर प्रश्न आता निर्माण झाला आहे. तज्ज्ञांच्या मते अशा क्रीम्स वापरून कायमस्वरूपी गोरे होता येत नाही, उलट त्वचा आणि किडनी दोन्ही धोक्यात येतात.

सरकारची बंदी आणि पोलिसांची कारवाई असूनही अशा उत्पादनांचा काळाबाजार सुरू असल्याचं चित्र आहे. त्यामुळे प्रशासनासमोर मोठं आव्हान उभं राहिलं आहे.

# हत्तीरोग निर्मूलनासाठी 'ट्रिपल ड्रग थेरपी' (आयडीए) मोहिमेला वेग –मुख्यमंत्री फडणवीस

**मुंबई (प्रतिनिधी)** –महाराष्ट्रासह देशभरात हत्तीरोग (लिम्फॅटिक फिलेरियासिस) निर्मूलनासाठी 'ट्रिपल ड्रग थेरपी' (आयडीए) अर्थात आयव्हरमेक्टिन, डीईसी (डायइथिलकार्बामाझीन) आणि अल्बेंडाझोल या औषधांच्या संयुक्त उपचाराला गती देण्यात येत आहे. केंद्र शासनाने २०२७ पर्यंत भारतातून हत्तीरोगाचे संपूर्ण उच्चाटन करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. या मोहिमेत राज्य शासनाने सक्रिय सहभाग घेतला असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की, विशेषतः दुर्लक्षित असलेल्या हत्तीरोगासारख्या आजारांवर प्रभावी उपाययोजना करण्यासाठी केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाने सुरुवात केली. देशात २०१७ मध्ये सर्वात प्रथम महाराष्ट्र राज्यात विशेषतः विदर्भातील जिल्ह्यांना या औषधोपचारासाठी सर्वोच्च प्राधान्य देण्याची केंद्र सरकारकडे विनंती केली होती. यामुळे महाराष्ट्रातील, विशेषतः विदर्भातील आदिवासी व ग्रामीण भागातील लोकांचे दुःख मोठ्या प्रमाणात कमी होण्यास मदत होत आहे. तसेच, देशातून हत्तीरोग निर्मूलन करण्याच्या प्रधानमंत्री यांच्या स्वप्नपूर्तीतही मोठा वाटा उचलून या उपक्रमात महाराष्ट्र शासन पूर्ण सहकार्य देत आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाच्या माध्यमातून देशातील १२ राज्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर 'मास ड्रग ॲडमिनिस्ट्रेशन' (एमडीए) मोहीम राबवली जात असून, त्यामध्ये महाराष्ट्राचाही समावेश आहे. या मोहिमेत पात्र नागरिकांना दरवर्षी प्रतिबंधात्मक औषधे दिली जातात, ज्यामुळे रोगाचा प्रसार रोखण्यास मदत होते. राज्यामध्ये विशेष म्हणजे, काही निवडक जिल्ह्यांमध्ये पारंपरिक दोन औषधांऐवजी 'ट्रीपल ड्रग थेरपी' (आयडीए) वापरली जात आहे. ही उपचारपद्धती अधिक प्रभावी मानली जाते आणि कमी कालावधीत रोग नियंत्रणात आणण्यास मदत करते.

महाराष्ट्रातील विदर्भ विभागात हत्तीरोगाचा मोठा प्रादुर्भाव असून, गडचिरोली, भंडारा, चंद्रपूर यासारख्या जिल्ह्यांमध्ये विशेष मोहिमा राबवण्यात येत आहेत. राज्यात सुमारे ५५ लाख नागरिकांना या औषधोपचाराचा लाभ देण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

नागपूर ग्रामीण भागात मोहिमेमुळे सूक्ष्मजंतूंचा प्रसार दर एक टक्क्यापेक्षा कमी आणण्यात यश

महाराष्ट्रातील नागपूर, चंद्रपूर, भंडारा, वर्धा, गडचिरोली, अमरावती, अकोला, लातूर, धाराशिव, सोलापूर, जळगाव, सिंधुदुर्ग, नांदेड, ठाणे, पालघर, नंदुरबार, सोलापूर आणि यवतमाळ या १८ जिल्ह्यात या रोगाचा प्रादुर्भाव आहे. फेब्रुवारी २०२६ च्या ताज्या अहवालानुसार, महाराष्ट्रातील हत्तीरोगाच्या एकूण प्रकरणांपैकी सुमारे ७५ टवके रुग्ण एकट्या नागपूर विभागात आहेत. सर्वाधिक प्रभावित पाच जिल्हे: भंडारा, चंद्रपूर, नागपूर, गडचिरोली आणि गोंदिया.

ट्रीपल ड्रग पॉलिसी (आयडीए) यशाचा दर: नागपूर ग्रामीण भागात या मोहिमेमुळे सूक्ष्मजंतूंचा प्रसार दर (एमएफ रेट) २०१४ मधील ४.९१ टक्क्यावरून २०२४ पर्यंत एक टक्क्यापेक्षा कमी आणण्यात यश आले आहे.

# भोंदू अशोक खरातकडे ४ सिमकार्ड, महिलांसाठी खास नंबर, ३ कार्डवरून ३ वेगळे कांड, एसआयटी तपासात माहिती



**नाशिक (प्रतिनिधी)**–भोंदू अशोक खरात याच्याविरोधातील तपासात मोठी घडामोड समोर आली असून, गेल्या पाच तासांपासून विशेष तपास पथकाकडून त्याची कसून चौकशी सुरू आहे. चौकशीदरम्यान अनेक महत्त्वाची माहिती उघड होत असल्याची सूत्रांची माहिती आहे.

प्राथमिक तपासात अशोक खरात चार वेगवेगळे मोबाईल क्रमांक वापरत असल्याचे समोर आले आहे. यापैकी एक क्रमांक हा केवळ व्हीआयपी व्यक्तींशी संपर्क साधण्यासाठी वापरला जात होता. दुसरा क्रमांक काही विशिष्ट भक्त आणि महिलांशी संवादासाठी वापरला जात असल्याची माहिती पुढे आली आहे. तिसरा मोबाईल क्रमांक हा आर्थिक व्यवहार आणि पैशांशी संबंधित कामांसाठी वापरला जात होता, तर चौथा क्रमांक हा सर्वसामान्य लोकांशी संपर्कासाठी असल्याचे समोर आले आहे. दरम्यान, या प्रकरणाचा सखोल तपास करण्यासाठी फॉरेन्सिक पथकाने सर्व मोबाईल फोन आणि संबंधित क्रमांकांचा डेटा पुनर्प्राप्त (डेटा रिकव्हरी) करण्याचे काम हाती घेतले आहे. या डेटामधून आणखी धक्कादायक बाबी समोर येण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

अशोक खरात याची एसआयटीकडून सुरु असलेली चौकशी आता अंतिम टप्प्यात पोहोचली आहे. न्यायालयाकडून पोलीस कोठडी मिळाल्यानंतर आयपीएस तेजस्वी सातपुते यांच्या नेतृत्त्वाखालील एसआयटी पथकाकडून प्रत्येक दिवशी अशोक खरात याची कसून चौकशी केली जात आहे. मंगळवारी सलग १३ व्या दिवशी अशोक खरात याची चौकशी सुरु झाली आहे. अशोक खरात याची पोलीस कोठडी उद्या संपणार आहे. यानंतर त्याला पुन्हा पोलीस कोठडीत पाठवले जाण्याची शक्यता कमी आहे. त्यामुळे उद्या कोर्टात नेण्यापूर्वी अशोक खरात याच्याविरोधात जास्तीत जास्त पुरावे गोळा करण्याचा एसआयटीचा प्रयत्न आहे. यादृष्टीने एसआयटीच्या हाती एक महत्त्वाची माहिती लागली आहे. अशोक खरात याने अनेक महिलांवर लैंगिक अत्याचार केले होते. मात्र, यापैकी एकही महिला गर्भवती झाली नव्हती. त्यासाठी अशोक खरात हा एखादे गर्भनिरोधक औषध वापरत असावा, असा दाट संशय पोलिसांना आहे.

या संशयामुळे अशोक खरात प्रकरणात पोलिसांकडून नाशिकमधील काही डॉक्टरांची चौकशी केली जाण्याची शक्यता आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, नाशिकमधील काही डॉक्टर पोलिसांच्या रडारवर आहेत.

## Change In Name

MY OLD NAME IS ANSARI MOHAMMED KHALEQ Which now I am. Changing as New Name: MOHAMMED KHALIQ ANSARI ABDUL SAMI Hence, forth my all correspondence. Will be done as per my New Name. Please consider, the same.

Address-9-7-1316, Devi Nagar, Degloor Naka, Mob. 9359633347

## Change In Name

I, Syed Afroz Hussain, H.No.8918, Madina Colony, Degloor Tq.Degloor Dist. Nanded-431717 [M.S.] I have changed my name of Syed Afroz Syed Shaukat [New name ] Syed Afroz S/o. Syed Iqbal. Hence forth my All correspondence will be done as my new name Please con- sider the same. Sign by-Syed Afroz S/o. Syed Iqbal. R/o. H.No.8918, Madina Colony, Degloor Tq.Degloor Dist. Nanded-431717

## Change In Name

I, Syed Shaukat Husain [Old name] R/o. H.No.8918, Madina Colony, Degloor Tq.Degloor Dist.Nanded-431717 [M.S.] I have changed my name of Syed Shaukat Syed Iqbal [New name ] Syed Shaukat S/o. Syed Iqbal. Hence forth my All correspondence will be done as my new name Please consider the same. Sign by-Syed Shaukat S/o. Syed Iqbal. R/o. H.No.8918, Madina Colony, Degloor Tq.Degloor Dist. Nanded-431717

# वैभव सूर्यवंशीला तातडीने लंडनला पाठवा; इंग्लंडच्या खेळाडूची बीसीसीआयकडे मागणी



**नवीदिल्ली(प्रतिनिधी)**– १५ वर्षांच्या वैभव सूर्यवंशीने आयपीएल २०२६ मधील आपल्या पहिल्याच सामन्यात वादळी कामगिरी केली. चेन्नई सुपर किंग्सविरुद्ध त्याने अवघ्या १५ चेंडूत अर्धशतक झळकावत ५२ धावांची तुफानी खेळी केली आणि संघाच्या विजयात मोलाची भूमिका बजावली. या जबरदस्त कामगिरीनंतर त्याच्यावर कौतुकाचा वर्षाव सुरू झाला आहे. इतकेच नाही, तर त्याला थेट सीनियर भारतीय संघात संधी द्यावी, अशी मागणीही आता जोर धरू लागली आहे.

मोहम्मद कैफनंतर आता इंग्लंडचा माजी कर्णधार मायकल वॉन यानेही बीसीसीआयकडे सूर्यवंशीला संधी देण्याची मागणी केली आहे. त्याच्या मते, आयपीएलनंतर भारताचा इंग्लंड दौरा होणार असून या युवा खेळाडूला त्या दौऱ्यावर घेऊन जाणे गरजेचे आहे. तो लगेच प्लेइंग इलेव्हनमध्ये खेळला नाही तरी चालेल, पण भारतीय संघाच्या वातावरणाचा अनुभव त्याला मिळणं महत्त्वाचं आहे, असं वॉनने सांगितलं.

दुसऱ्या बाजूला यशस्वी जैस्वाल याचाही उल्लेख करत वॉनने तुलना केली. जैस्वाल शांत आणि संयमी खेळ करत होता, तर सूर्यवंशी पूर्णपणे आक्रमक मूडमध्ये होता. जैस्वाल चेंडू समजून खेळत होता, पण सूर्यवंशी फक्त चेंडू सीमारेषेबाहेर पाठवण्यासाठीच खेळत होता. त्याच्या खेळात एक विलक्षण निर्भयता आणि मोकळेपणा दिसतो, असं वॉन म्हणाला.

जैस्वालनेही आपल्या कारकिर्दीत लहान वयात मोठी कामगिरी केली होती. अंडर–१९ वर्ल्ड कप फायनलमध्ये त्याने १७५ धावांची शानदार खेळी केली होती. त्यानंतर डोमेस्टिक क्रिकेट आणि इंडिया '' संघातून सातत्याने चांगली कामगिरी करत तो आज भारतीय संघाचा महत्त्वाचा भाग बनला आहे.

वैभव सूर्यवंशीबाबत आता उत्सुकता आणखी वाढली आहे. आयसीसीच्या नियमानुसार १५ वर्षांचा असल्यामुळे तो आंतरराष्ट्रीय क्रिकेट खेळण्यासाठी पात्र आहे. त्यामुळे येत्या काही महिन्यांत तो भारतीय संघाच्या जर्सीत दिसणार का, याकडे सगळ्यांचे लक्ष लागले आहे.

## टी. सी. हरवली

माझी सलीम बाशुमिया शेख या नावाची इयत्ता ८ वी पासची टी. सी. हिमायतनगर ते नांदेड दरम्यान रेल्वे प्रवासात हरवली आहे. ज्यांना कोणाला सापडली असेल त्यांनी कृपया खालील मोबाईल नंबरवर संपर्क साधावा.

संपर्क नंबर–९४२०८४८५१८

## Change In Name

I, Surayya Begum Mohd.Abdul Rahim, Plot No.58, Ekta Nagar, Taroda [BK], Nanded -431605 [M.S.] I have changed my name of Surayya Begum W/o. Mohammad Nazeeruddin [ New name ] Surayya Begum W/o. Mohammad Nazeeruddin. Hence forth my All correspondence will be done as my new name Please consider the same. Sign by-Surayya Begum W/o.Mohammad Nazeeruddin. Plot No.58,Ekta Nagar, Taroda [BK], Nanded -431605[M.S.] Mob.No.9923472555

## Change In Name

I, Mohammed Nazeeruddin Md. Jamaluddin, Plot No.58, Ekta Nagar, Taroda [BK], Nanded -431605 [M.S.] I have changed my name of Mohammad Nazeeruddin Mohammad Jamaluddin [ New name ] Mohammad Nazeeruddin Mohammad Jamaluddin. Hence forth my All correspondence will be done as my new name Please consider the same.

Sign by-Mohammad Nazeeruddin Mohammad Jamaluddin Plot No.58, Ekta Nagar, Taroda [BK], Nanded -431605[M.S.] Mob.No.9923472555

## Change In Name

1, Nameera Firdouse Mohammed Manzoor, H.No.1-3-142, Abu Bakar Colony, Narangal Road, Degloor Tq.Degloor Dist. Nanded-431717 (M.S.) I have changed my name of Nameera Firouse Shaikh Sameer [ New name 1 Nameera Firouse W/D. Shaikh Sameer. Hence forth my All correspondence will be done as my new name please consider the same. Sign by-Nameera Firouse W/o. Shaikh Sameer. H.No.1-3-142, Abu Bakar Colony, Narangal Road, Degloor Tq.Degloor Dist.Nanded-431717 [M.S.]


## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.

संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८



**रामबाण ईलाज**

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

**सेवा क्लिनीक**

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९१०१

तसेच दवाखान्यात बीएएमएस महिला डॉक्टरची नेमणूक करणे आहे.



# गोदातीर समाचार



**पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस**

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308




# आयजींच्या पथकाची नांदेड परिक्षेत्रात गुटखा विरोधी मोहीम; लातूरमध्ये छापा, ८ लाखांचा मुद्देमाल जप्त

**नांदेड (प्रतिनिधी)** –दिनांक १६ ते ३१ मार्चदरम्यान पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी नांदेड परिक्षेत्रात गुटखा व प्रतिबंधित तंबाखूजन्य पदार्थांविरुद्ध व्यापक मोहीम उघडली आहे. या मोहिमेच्या अनुषंगाने पथकास एका महिंद्रा कंपनीच्या बोलेरोमधून गुटखा उदगीरकडे घेऊन जाणार असल्याची माहिती मिळाली होती.या माहितीवरून दि. ३० मार्च रोजी पोलीस ठाणे वाढवणा हद्दीत उदगीर–अहमदपूर रोडवरील वाढवणा पाटीजवळ सदरची बोलेरो थांबवली असता, सदर वाहनात अवैधरित्या विक्री करण्यासाठी घेवून जात असलेला २ लाख ४९ हजार ६०० रुपयांचा गुटखा व एक महिंद्रा कंपनीची बोलेरो असा एकूण ८ लाख १२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.





या प्रकरणी आरोपी रसूल इब्राहिम शेख (वय ४१ वर्षे, रा. भाग्यनगर, ता. अहमदपूर, जि. लातूर) आणि राजू गुरुलींग हामणे (रा. भाग्यनगर, ता. अहमदपूर, जि. लातूर) यांच्याविरुद्ध वाढवणा पोलीस ठाणे येथे गुरनं ८१/२०२६ कलम १२३, ६२, २२३, २७४, २७५, ३(५), भारतीय न्याय संहिता सह कलम ५९ अन्न सुरक्षा आणि मानके अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून,या गुन्ह्याचा तपास पोलीस ठाणे वाढवणा येथील सपोनि सुनिल गायकवाड करीत आहेत.

या मोहिमेदरम्यान, स्वादिष्ट, सुगंधित तंबाखू, अपमित्रके युक्त चघळण्याची तंबाखू, स्वादिष्ट, सुगंधित सुपारी, गुटखा, पान मसाला, खर्रा, मावा व तत्सम पदार्थांची साठवण, वितरण व वाहतूक याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम १२३ अन्वये कारवाई करण्यात येत आहे.

उपरोक्त पदार्थाच्या संदर्भात, संबंधिताविरुद्ध कलम १२३ बी.एन.एस. अन्वये करण्यात आलेल्या कारवाईचा खटला हा सत्र न्यायालयात चालणारा असून त्यास दहा वर्षे पर्यंतच्या कारावासासह द्रव्य दंडाची देखील शिक्षा आहे.

अवैध व्यवसायांची माहिती थेट पोलिसांकडे पोहोचाविता यावी, या दृष्टिकोनातून पोलीस उपमहानिरीक्षक कार्यालयाने ९१ ५० १०० १०० हा मोबाईल क्रमांक असलेली 'खबर' नावाची हेल्पलाईन सुरू केली असून, नागरिकांनी आपल्या भागातील अवैध व्यवसायांची माहिती, या क्रमांकावर फोन करून अथवा व्हॉट्सअप मेसेजद्वारे पाठवावी, असे आवाहन नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी केले आहे.

# सिटी स्ट्रीट सेफ्टी पथकाची सार्वजनिक ठिकाणी दारू पिऊन शांतता भंग करणाऱ्यांवर धडक कारवाई

**नांदेड (प्रतिनिधी)** –शहरातील सार्वजनिक ठिकाणी घडणाऱ्या गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी स्थापन केलेल्या नांदेड सिटी स्ट्रीट सेफ्टी ड्राईव्ह अंतर्गत पथकाने दिनांक २९ व ३० मार्च रोजी शहरात सार्वजनिक ठिकाणी दारू पिऊन सार्वजनिक शांततेचा भंग करणाऱ्या व्यक्तींवर कारवाई करण्यात आली आहे.

विमानतळ सिटी स्ट्रीट सेफ्टी ड्राईव्ह पथकातील चार्ली क्रमांक दोनमधील पोलीस अंमलदार यांना पेट्रोलींग दरम्यान वसंतराव नाईक चौक येथे १ इसम हा मद्यप्राशन करून सार्वजनिक शांततेचा भंग करीत असताना मिळून आल्याने त्याचेवर कलम ११०/११७ म.पो. कायद्याप्रमाणे कारवाई करण्यात आली आहे. तसेच हद्दीतील दारूची दुकाने, वाईन शॉप, हॉटेल्स तपासण्यात आले.

वजिराबाद सिटी स्ट्रीट सेफ्टी ड्राईव्ह पथकातील चार्ली क्रमांक एक मधील पोलीस अंमलदार यांना पेट्रोलींग दरम्यान कलामंदिर येथे १ इसम हा मद्यप्राशन करून सार्वजनिक शांततेचा भंग करीत असतांना मिळून आल्याने त्याचेवर कलम ११०/११७ म.पो. कायदा प्रमाणे कारवाई करण्यात आली आहे. तसेच हद्दीतील दारूची दुकाने, याईन शॉप, हॉटेल्स तपासण्यात आले.

नांदेड ग्रामीण सिटी स्ट्रीट सेफ्टी ड्राईव्ह पथकातील चार्ली क्रमांक दोन मधील पोलीस अमलदार यांना पेट्रोलींग दरम्यान एमआयडीसी येथे २ इसम हे मद्यप्राशन करून सार्वजनिक शांततेचा भंग करीत असतांना मिळून आल्याने त्यांचेवर कलम ११०/११७ म. पो. कायदा प्रमाणे कारवाई करण्यात आली आहे. तसेच हद्दीतील दारूची दुकाने, वाईन शॉप, हॉटेल्स तपासण्यात आले.

दामिनी पथकातील अधिकारी व अंमलदार यांना पेट्रोलींग दरम्यान यशवंत महाविद्यालय रोडवर, विष्णुपुरी कोचिंग क्लासेस परिसर येथे ८ इसम हे आरडाओरड करून सार्वजनिक शांततेचा भंग करीत असतांना मिळून आल्याने त्यांचेवर पो. स्टे. भाग्यनगर, शिवाजीनगर, नांदेड ग्रामीण येथे कलम ११०/११७ म.पो.का. प्रमाणे कारवाई करण्यात आली आहे

नांदेड शहरात कोणीही सार्वजनिक ठिकाणी दारू पिऊ नये तसेच दारू पिण्यासाठी जागा उपलब्ध करून देऊ नये व सार्वजनिक शांततेचा भंग करू नये अन्यथा संबंधित इसमांवर कडक कारवाई करण्यात येईल, असा इशारा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी दिला आहे.





**नांदेड** – भगवान महावीर यांच्या जयंतीनिमित्त महावीर चौक येथून मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीत महिला व पुरूष तसेच बालकांनी विशेष अशी वेशभूषा करून उत्स्फुर्त सहभाग दर्शविला. (छाया : करणसिंह बैस)

# महात्मा फुले यांचे द्विशताब्दी जयंती वर्ष शिक्षणक्रांती वर्ष म्हणून साजरे करा –दीपक कदम

**नांदेड (प्रतिनिधी)**– आगामी वर्ष हे महात्मा फुले यांचे द्विशताब्दी जयंती वर्ष शिक्षणक्रांती वर्ष म्हणून आंबेडकरवादी समाजाने साजरे करावे, असे आवाहन आंबेडकरवादी मिशनचे प्रमुख दीपक कदम यांनी केले. उमरखेड तालुक्यातील हरदड येथे आयोजित तिसऱ्या धम्म परिषदेत ते प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते.



यावेळी दीपक कदम यांना फुले, शाहू, आंबेडकर कार्यशील शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात आला. डॉ प्रोफ भास्कर दवने यांनाही पुरस्कार प्रदान करण्यात आला.

अविद्या हा सर्वात मोठा रोग असल्याचे बुद्धांनी सांगितले. सम्यक दृष्टी माध्यमातून अविद्या नष्ट करता येते. शिक्षित मनुष्य खरा बौद्ध बनू शकतो, त्यामुळे मुलांना उच्च शिक्षण देण्यावर समाजाने लक्ष द्यावे, असे आवाहन दीपक कदम यांनी केले.

याप्रसंगी भंते पंयाबोधी व भिक्खू संघ, डॉ. प्रा. काळबांडे, जमदाडे, बनसोडे आदी मान्यवर उपस्थित होते.

# नरहर कुरुंदकर केंद्राच्यावतीने रवीन्द्र पाटील यांचे व्याख्यान

**नांदेड (प्रतिनिधी)**– नरहर कुरुंदकर प्रगत अध्ययन व संशोधन केंद्राच्यावतीने गुरुवार, दि. २ एप्रिल २०२६ रोजी जळगाव येथील इतिहासाचे अभ्यासक रवीन्द्र पाटील यांचे 'जगण्याचे सूत्र–शिवचरित्र' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या इतिहासाचा व तत्कालीन भौगोलिक परिस्थितीच्या अभ्यासाचा ध्यास असलेले रवीन्द्र पाटील शिवचरित्राच्या विविध पैलूंवर व्याख्याने देत असतात. 'इतिहास प्रबोधन संस्था' व 'वेध रायगडाचा प्रतिष्ठान' या संस्थांचे ते विश्वस्त आहेत. 'वेध रायगडाचा', 'राजा माझा सांगून गेला' व 'देवगिरी' ही त्यांची पुस्तके प्रकाशित आहेत. ज्ञान फाऊंडेशन इंडियन आयडॉल पुरस्कार, साहित्य सेवा पुरस्कार व राजस्थानच्या कवी भूषण पुरस्कारांनी त्यांना गौरविण्यात आले आहे.

सायन्स कॉलेज परिसरातील नरहर कुरुंदकर स्मारकात सायं. ६ वाजता होणाऱ्या या व्याख्यानाचा इतिहासप्रेमींनी अवश्य लाभ घ्यावा, असे आवाहन संचालक डॉ. यशवंत जोशी यांनी केले आहे.

# वादळी वारा व विजेच्या कडकडाटाने शंकरनगर परिसरातील पिकांचे नुकसान; तत्काळ पंचनामे करा –शेतकऱ्यांची मागणी

**शंकरनगर (प्रतिनिधी)** –शंकरनगर परिसरात सोमवारी रात्री दहा ते अकराच्या सुमारास आलेल्या अचानक वादळी वाऱ्यासह विजेच्या कडकडाटामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. ज्वारी, हळद, आंबा, टरबूज, तंबाखू यांसह विविध नगदी व हंगामी पिके जमिनीवर आडवी पडल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे.

हातातोंडाशी आलेला घास निसर्गाच्या अवकृपेने हिरावला गेल्याने शेतकरी हतबल झाला असून, शासनाने तात्काळ पंचनामे करून नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी शंकरनगर परिसरातील शेतकऱ्यांकडून होत आहे.



गेल्या काही दिवसांपासून वातावरणात अचानक बदल होत असून, जोरदार वाऱ्यासह अवकाळी पाऊस आणि विजेचा कडकडाट होत आहे. नांदेड जिल्ह्यात 'यलो अलर्ट' जारी करण्यात आला असून, काही ठिकाणी गारपिटीच्याही घटना घडल्याचे दिसून येत आहे.

या वादळी वाऱ्यामुळे ऊस, तंबाखू, ज्वारी, हळद यांसारखी पिके मोठ्या प्रमाणात जमिनीवर कोसळली आहेत. ज्वारी पूर्णपणे आडवी पडली असून, हळदीच्या पिकांनाही मोठा फटका बसला आहे. तसेच टरबूजसारख्या पिकांचेही मोठे नुकसान झाल्याचे समोर आले आहे.

दरम्यान, चिटमोगरा येथील शेतकरी मारोती पिराजी कोकणे यांच्या शेतात वीज पडून जनावरांच्या वैरणीचे मोठे नुकसान झाले आहे. शकंरनगर परिसरात काही ठिकाणी घरावरील पत्रे व खापरे उडून गेल्याने नागरिकांचेही नुकसान झाले आहे.

# लोहा पं. स. चे माजी उपसभापती नरेंद्र गायकवाड यांचा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश



**लोहा (प्रतिनिधी)**– लोहा पंचायत समितीचे माजी उपसभापती नरेंद्र गायकवाड यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचा राजीनामा देऊन उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश केला आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसचे लोहा मतदारसंघाचे आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांचे कट्टर समर्थक म्हणून ओळखले जाणारे व लोहा पंचायत समितीचे माजी उपसभापती नरेंद्र गायकवाड हे पँथर पॉवर ॲटो युनियनचे प्रदेशाध्यक्ष आहेत. त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीला सोडचिठ्ठी देत नांदेड येथे शिवसेनेचे मुख्य नेते तथा राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवसेनेत जाहीर प्रवेश केला.

यावेळी शिवसेनेचे आमदार हेमंत पाटील, आ. आनंदराव पाटील बोंढारकर, शिवसेनेचे नांदेड दक्षिण जिल्हाप्रमुख विनय गिरडे, शिवसेनेचे दक्षिण तालुका प्रमुख उध्दव पाटील शिंदे आदी उपस्थित होते.

# आनंदा गायकवाड यांचे निधन



**भोकर (प्रतिनिधी)**– सेवानिवृत्त शिक्षक आनंदा नारायणराव गायकवाड यांचे मंगळवार, दि. ३१ मार्च रोजी १२ वाजता हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. ते ६२ वर्षाचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, आई, तीन भाऊ, दोन मुले, एक मुलगी, नातवंडे असा परिवार आहे. प्रकाश, गंगाधर, यशवंत गायकवाड यांचे ते भाऊ होत. बुधवार, दि. १ एप्रिल रोजी सकाळी १० वाजता मौजे रिठा ता. भोकर येथे त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

# कर्तृत्त्ववान महिलांचा 'निमा रत्न' ने गौरव; चौथ्या वर्षाचा पुरस्कार सोहळा उत्साहात



**नांदेड (प्रतिनिधी)**– जागतिक महिला दिनाच्या पार्श्वभूमीवर 'निमा वुमेन्स फोरम' आणि 'आर्या क्लिनिक' यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २९ मार्च रोजी नमस्कार चौक येथील आर्या क्लिनिकमध्ये मोफत रोगनिदान शिबिरासह 'महिला निमा रत्न' पुरस्कार वितरण सोहळा उत्साहात संपन्न झाला. सकाळी ११ ते दुपारी ३ या वेळेत आयोजित या उपक्रमाला शहरातील महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

महिलांसाठी ही महत्त्वाची आरोग्यसंधी ठरली. या शिबिराचे उद्घाटन नांदेड– वाघाळा शहर महानगरपालिकेच्या नगरसेविका मीनल पाटील यांच्या हस्ते झाले. यावेळी नगरसेविका सरिता पवळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमादरम्यान विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या महिलांचा 'महिला निमा रत्न' पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. शिबिरामध्ये त्वचारोग, स्त्रीरोग, अस्थिरोग तसेच सर्वसाधारण औषधोपचार अशा विविध विभागातील तज्ज्ञ डॉक्टरांकडून महिलांची मोफत तपासणी करण्यात आली. त्वचा व केसांच्या समस्या, गरोदर मातांची तपासणी, मधुमेह, उच्च रक्तदाब, छातीत दुखणे तसेच हात–पाय सुन्न होणे यांसारख्या आजारांवर विशेष लक्ष केंद्रित करून सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. या उपक्रमात डॉ. सुमित अग्रवाल, डॉ. विजया जाधव, डॉ. प्रसाद देशमुख आणि डॉ. राजेश्वरी पवार यांच्यासह निमाचे पदाधिकारी डॉ. श्रीराम कल्याणकर, डॉ. अविनाश वडजे, डॉ. किशोर लोहिया आणि डॉ. वंदना दुधमल यांची उपस्थिती होती.

# बीएसएनएल टॉवर उभारणीसाठी दूरसंचार मंत्री सिंदिया यांच्याकडे खा. आष्टीकर यांचे साकडे

## ग्रामीण भाग 'नो नेटवर्क'च्या छायेत

**हदगांव (प्रतिनिधी)**– हिंगोली व नांदेड जिल्ह्यातील ग्रामीण भागात बीएसएनएलचे नेटवर्क अत्यंत कमकुवत असल्याने नागरिकांना दळणवळणाच्या सेवा मिळण्यात अडचणी येत आहेत. या पार्श्वभूमीवर बीएसएनएलचे नेटवर्क सुधारावे, नवीन टॉवर उभारणी करावी व ग्रामीण भागात ग्राहकवाढीसाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात, या मागण्यांसाठी केंद्रीय दूरसंचार मंत्री ज्योतीरादित्य शिंदिया यांची खासदार आष्टीकर यांनी भेट घेऊन निवेदन देण्यात आले.

या वेळी केंद्रीय मंत्री ज्योतीरादित्य शिंदिया यांच्या समोर ग्रामीण भागातील नेटवर्क समस्यांची सविस्तर माहिती दिली. अनेक गावांमध्ये मोबाईल नेटवर्क अत्यंत कमजोर असून इंटरनेट सेवा देखील वारंवार खंडित होत असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले. त्यामुळे विद्यार्थ्यांचे ऑनलाइन शिक्षण, शेतकऱ्यांचे डिजिटल व्यवहार तसेच सर्वसामान्य नागरिकांचे दैनंदिन कामकाज प्रभावित होत असल्याचे सांगण्यात आले.

या निवेदनामध्ये हिंगोली व नांदेड जिल्ह्यातील दुर्गम व ग्रामीण भागात नवीन बीएसएनएल टॉवर उभारणे, विद्यमान टॉवरचे आधुनिकीकरण करणे तसेच नेटवर्कची गुणवत्ता सुधारण्यासाठी तातडीने उपाययोजना करण्याची मागणी करण्यात आली. यासोबतच बीएसएनएलच्या सेवांचा विस्तार करून अधिकाधिक नागरिकांना परवडणाऱ्या दरात दर्जेदार सेवा उपलब्ध करून द्याव्यात, असेही नमूद करण्यात आले.



केंद्रीय मंत्री शिंदिया यांनी या मागण्यांकडे सकारात्मक दृष्टीने पाहत संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा करून आवश्यक ती कारवाई करण्याचे आश्वासन दिले. ग्रामीण भागातील दळणवळण सुविधा मजबूत करण्यासाठी केंद्र सरकार कटिबद्ध असल्याचे त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

या भेटीमुळे हिंगोली व नांदेड जिल्ह्यातील नागरिकांना लवकरच सुधारित बीएसएनएल सेवा मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.


**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड–४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड–४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड–(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com